The Professional
Cosmoholic
Hair Beauty & Makeup Studio
Pro. V. D. Kharde
(Professional Makeup Artist, Pune)
8698307788

दैनिक
# जनता आवाज

लग्न बस्त्याची खास सोय
प्रोप्रा. आर. एन. शिंगवी
महावीर क्लॉथ स्टोअर्स
रेडीमेड | होजिअरी | सुटींग | शर्टींग | साड्या
कोल्हार बु॥, ता. राहाता, जि. अ.नगर.
M. 9860329429, 9822595353

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक २५८ | बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# आमची सत्तेकडून सेवेकडे वाटचाल

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; आता पीएमओ नव्हे सेवा तीर्थ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली : आम्ही सत्तेकडून सेवेकडे वाटचाल करत आहोत. हा बदल प्रशासकीय नसून सांस्कृतिक आहे. सार्वजनिक संस्थांमध्ये मोठे बदल होत असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी दिली. केंद्र सरकारने पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलून सेवा तीर्थ केले आहे. तर देशभरातील राजभवनांना लोक भवन असे संबोधले जाईल. तसेच, केंद्रीय सचिवालयाचे नाव कर्तव्य भवन असे असणार आहे. यापूर्वी केंद्र सरकारने राजपथचे नाव बदलून कर्तव्य पथ केले होते. तर पंतप्रधान निवासस्थान आता लोक कल्याण मार्ग म्हणून ओळखले जाते. यापूर्वी पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान रेस कोर्स रोड म्हणून ओळखले जात होते, जे २०१६ मध्ये बदलण्यात आले.**

### कर्तव्य पथ भोवतीच्या बदल

सरकारचे उद्दिष्ट आहे की कर्तव्य पथ (पूर्वीचा राजपथ) च्या ३ किमी क्षेत्राला आधुनिक, पादचारी अनुकूल आणि सरकारी क्षेत्रात रूपांतरित केले जावे. याचा एक मोठा भाग म्हणजे नवीन कॉमन सेंट्रल सेक्रेटेरिएट, ज्याला आता कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे.

### नॉर्थ-साउथ ब्लॉकचे नवीन स्वरूप

सेंट्रल व्हिस्टा योजनेअंतर्गत ऐतिहासिक नॉर्थ ब्लॉक आणि साउथ ब्लॉकला पुढे युग-युगीन भारत संग्रहालय मध्ये रूपांतरित केले जाईल. यासाठी फ्रान्सच्या म्युझियम डेव्हलपमेंट एजन्सीसोबत करार करण्यात आला आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने गेल्या वर्षी राज्यपालांच्या परिषदेत झालेल्या चर्चेचा हवाला देत म्हटले आहे की, राजभवन हे नाव वसाहतवादी मानसिकतेचे प्रतीक आहे. त्यामुळे राज्यपाल आणि उप-राज्यपालांच्या कार्यालयांना आता लोक भवन आणि लोक निवास या नावाने ओळखले जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्यालय आता ७८ वर्षांच्या जुन्या साउथ ब्लॉक मधून बाहेर पडून सेवा तीर्थ नावाच्या नवीन प्रगत कॅम्पसमध्ये स्थलांतरित होणार आहे. हा बदल सेंट्रल व्हिस्टा पुनर्विकास प्रकल्पाचा एक मोठा भाग आहे. १४ ऑक्टोबर रोजी कॅबिनेट सचिव टी.व्ही. सोमनाथन यांनी सेवा तीर्थ-२ मध्ये सेना प्रमुखांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली आहे.

पीएमओ सेवा तीर्थ-१ मधून काम करणार आहे. सेवा तीर्थ-२ मध्ये कॅबिनेट सचिवालय असणार आहे. सेवा तीर्थ-३ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचे कार्यालय असणार आहे.

सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पात राष्ट्रपती भवन ते इंडिया गेटपर्यंत अनेक इमारतींचा पुनर्विकास आणि बांधकाम समाविष्ट आहे. यामध्ये नवीन संसद भवन, मंत्रालयीन कार्यालयांसाठी केंद्रीय सचिवालय, पंतप्रधानांचे निवासस्थान आणि उपराष्ट्रपतींचे निवासस्थान बांधणे समाविष्ट आहे.

सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाची घोषणा सप्टेंबर २०१९ मध्ये करण्यात आली. १० डिसेंबर २०२० रोजी पंतप्रधान मोदींनी या प्रकल्पाची पायाभरणी केली. सरकारने संपूर्ण प्रकल्पासाठी २०,००० कोटी रुपयांचे बजेट वाटप केले आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंच्या भागाला सेंट्रल व्हिस्टा म्हणतात.

१० नवीन कार्यालय ब्लॉक (इमारती) बांधण्यात आले आहेत, जिथे ती मंत्रालये स्थलांतरित होतील. जी सध्या शास्त्री भवन, निर्माण भवन आणि कृषी भवन यांसारख्या जुन्या इमारतींमध्ये विखुरलेली आहेत. एक नवीन सीसीएस ब्लॉक गेल्या महिन्यात उद्घाटनानंतर कार्यान्वित झाला आहे, तर आणखी तीन ब्लॉक तयार आहेत.

# ...आता २१ डिसेंबरला निवडणुकींचा निकाल

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्वाळा




**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा ताण-तणाव वाढत असताना, मतमोजणीच्या तारखेबाबत आता मोठा संभ्रम निर्माण दूर झाला आहे. सुरुवातीला राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबरला मतदान आणि ३डिसेंबरला निकाल जाहीर होईल, असे सांगितले होते. मात्र काही नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये न्यायालयीन पेच निर्माण झाल्याने आयोगाने आपल्या कार्यक्रमात बदल करत, ज्या ठिकाणी वाद सुरू आहे, तेथे २० डिसेंबर मतदान व २१ डिसेंबरला निकाल असा नवीन आदेश देऊन परिस्थिती अधिक गुंतागुंतीची केली होती.

याच पार्श्वभूमीवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. त्यानुसार उद्याची मतमोजणी रद्द करण्यात आली आहे. आता २१ डिसेंबरलाच सर्व ठिकाणचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. तोपर्यंत आचारसंहिता कायम राहणार आहे.

खंडपीठाने सोमवारच्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या वकिलांना थेट विचारणा केली होती, सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल २१ डिसेंबरलाच देता येतील का? पान ४

### अपेक्षेप्रमाणेच सर्वच निकाल लांबणीवर

मतमोजणीचा दिवसच निश्चित नसल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये मात्र बेचैनीचे वातावरण होते. मतदारांनी दाखवलेला विश्वास नेमका कधी उघड होणार? निवडणूक आयोग पुन्हा कार्यक्रमात बदल करणार का? न्यायालयाचा आदेश कोणत्या दिशेने वळणार? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत राजकीय तणाव वाढत गेला. मात्र, आता अपेक्षेप्रमाणेच सर्वच निकाल लांबणीवर पडला आहे.

## संमिश्र

### चौथ्यांदा भाजपचा राष्ट्रीय अध्यक्ष यूपीमधून होणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव मौर्य आणि राज्यसभा सदस्य डॉ. दिनेश शर्मा यांची नावेही दावेदारांच्या यादीत समाविष्ट आहेत. दिल्लीत यावर विचारमंथन सुरू आहे. जर राष्ट्रीय अध्यक्षपदावर या दोन्ही नेत्यांपैकी कोणाची निवड झाली, तर ते उत्तर प्रदेशमधून भाजपचे चौथे राष्ट्रीय अध्यक्ष ठरतील. बिहार निवडणूक जिंकल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षांच्या नियुक्तीबाबत हालचालींना वेग आला आहे.

### देशात मनमानी सुरू आहे!: राज ठाकरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : देशात मनमानी सुरू आहे, अशा ४ शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकण्याच्या निर्णयावर संताप व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी चिंता व्यक्त केली आहे. उच्च न्यायालयाचा आजच्या निकालाने निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर शिक्कामोर्तबच झाले आहे, असे ते म्हणाले. नागपूर खंडपीठाने मंगळवारी एका याचिकेवर सुनावणी करताना उद्याची मतमोजणी २१ तारखेपर्यंत लांबणीवर टाकली.




# महिला सक्षमीकरणात शालिनीताई विखेंचे योगदान

## सचिन वराळ पाटील; सौ. विखेंचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक अभिनव प्रयोग केले. महिलांना स्वतःची ओळख निर्माण करून देण्यामध्ये मोठा सिंहाचा वाटा उचलला व मुलींच्या शिक्षणाकरिता अनेक शैक्षणिक समाजपयोगी उपक्रम राबविले आहेत, असे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी केले.



लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयात शालिनीताई विखे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नारळाच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

वराळ पाटील पुढे म्हणाले की, सहकारमहर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण मा. खा. बाळासाहेब विखे पाटील यांच्या कार्याचा वारसा जोपासत जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पान ४

### मंत्री विखेंच्या निधीतून इंट्राक्टीव पॅनल बोर्ड

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित जिल्हा परिषदेच्या अळकुटी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून शाळेसाठी डिजीटल डिस्पले असलेला इंट्राक्टीव पॅनल बोर्ड देण्यात आला.

# नगरपरिषद, पंचायतींसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण

## शिर्डी, बुलढाण्यात बोगस मतदान; आ. बांगरांवर गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी/ मुंबई** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी काल सायंकाळी संपुष्टात आली. राज्यातील २६२ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी काल (मंगळवारी) मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ७.३० वाजता सुरू झालेली ही मतदान प्रक्रिया सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालली. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

काल पार पडलेल्या मतदानानंतर हजारो उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झाले आहे. आता उमेदवारांसह संपूर्ण राज्याचे लक्ष २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे आणि निकालाकडे लागले आहे. स्थानिक पातळीवर कोणाची सत्ता येणार आणि कोण बाजी मारणार? हे आता निकालाच्या दिवशीच स्पष्ट होईल.

शिर्डी नगरपरिषद निवडणुकीत बोगस मतदान झाल्याचे समोर आले आहे. शोभा शिंदे या मतदानासाठी गेल्या होत्या. तेव्हा त्यांचे मतदान अगोदर झाले असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांचे मतदान कोणी केले,असा सवाला आता विचारला पान ४

# भल्या पहाटे नगरमध्ये अग्नी-तांडव

## ३ मजली इमारतीचा झाला कोळसा; लाखो रुपयांचे नुकसान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील बुरुड गल्लीतील काळा मारुती मंदिराशेजारील एका जुन्या सागवानी लाकडी बांधकाम असलेल्या ३ मजली इमारतीला आज २ डिसेंबर रोजी भल्या पहाटच्या सकाळी भीषण आग लागली. अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. पण आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात बराच वेळ लागला. त्यामुळे संपूर्ण इमारत जळून खाक झाली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पान ४

### ... त्यामुळे ६ घरे बचावली

आगीचा जास्त भडका होऊ लागल्याने या इमारती शेजारी असलेल्या घरांमधील नागरिकांना बाहेर काढण्यात आले. परिसरातील सहाही घरांमधील गॅस टाक्या, कपडे बाहेर काढण्यात आल्या. सुदैवाने आग शेजारील घरांकडे पसरली नाही त्यामुळे ६ घरे बचावली आहेत.

# बिबट्या जनसंख्या नियंत्रण प्रस्तावास मंजुरी द्या

## खा. निलेश लंके यांची केंद्र सरकारकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नाशिक मंडलात वाढत चाललेल्या मानवीबिबट्या संघर्षाच्या धोकादायक परिस्थितीकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे केली. महाराष्ट्र शासनाने वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेल्या बिबट्या जनसंख्या नियंत्रण प्रस्तावाला त्वरित 'मूलतत्त्व मंजुरी' द्यावी, असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले.



अहिल्यानगर जिल्ह्यासह अनेक भागात जंगल नसतानाही बिबट्यांची वस्ती वाढत असून ऊस शेती, मानवी वस्त्या व बागायती पट्ट्यात बिबट्यांचे वारंवार दर्शन होत आहे. त्यामुळे महिला, मजूर, शेतकरी आणि लहान मुलांवर गंभीर जीविताचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही वर्षांत मृत्यू, जखमी होणे आणि पाळीव जनावरांच्या हल्ल्यांतही मोठी वाढ झाल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या अहवालात नमूद आहे.

पारंपरागत उपाय निष्फळ ठरत असल्याने शासनाने वैज्ञानिक उपाय सुचविले आहेत. नर व मादी बिबट्यांवर सूक्ष्म पान ४

> संघर्षाची गंभीरता लक्षात घेता मंजुरी विलंबित करू नये, तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या कलमानुसार सविस्तर कार्ययोजनेला परवानगी द्यावी, अशी मागणी लंके यांनी केली. नाशिक मंडलातील हा प्रकल्प देशातील मानवी-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनासाठी 'राष्ट्रीय आदर्श प्रकल्प' ठरू शकतो.
>
> **– निलेश लंके, खासदार**

# जामखेड मतदारसंघात गुंडांना उमेदवारी

## आ. रोहित पवारांचा हल्लाबोल; शिंदे गट-भाजपने मतदारांना पैसे दिल्याचाही आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : माझ्या जामखेड मतदारसंघात भाजपने गुंड, मटका खेळणाऱ्याच्या आणि सावकारांच्या घरात उमेदवारी दिली आहे. यामुळे काही प्रमाणात दहशत या भागात नक्कीच आहे, पण लोक योग्य तो निर्णय घेतील, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. पण गेल्या काही दिवसांमध्ये निवडणूक आयोगाची जी वागणूक आहे त्यांनी सरकारला जसे पाहिजे तसे जीआर बदलले आहेत, असा आरोप रोहित पवारांनी केला आहे.



रोहित पवार म्हणाले की, मुख्यमंत्र्यांना वेळी नसल्यामुळे १ तारखेपर्यंत मतदानाच्या १ दिवस पूर्वी पर्यंत त्यांनी सभा ठेवण्यास परवानगी देण्यात आली. जिथे भाजपच्या बाजूने काम केले नाही त्या ठिकाणाहून सीएम यांना फोन केले जात होते आणि निवडणूक आयोगाला सांगण्यात येत होते त्या पद्धतीने जीआर बदलण्यात आले. यामध्ये बारामती, फलटण, इंदापूरसाठी जीआर बदलण्यात आले.

आ. पवार म्हणाले की, जामखेड नगर परिषदेवर शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेनेचे मित्र पक्षांची सत्ता येईल. कारण आम्ही सामान्य माणसांना संधी दिली आहे. सामान्य लोकांना संधी दिली तर जनता मागे उभी राहते असा संदेश जामखेडमधील सामान्य माणूस राज्याला आणि देशाला देण्याचे काम करतील.

### .. तर लोकशाही राहील का?

रोहित पवार म्हणाले की, निवडणूक आयोग जर अशा पद्धतीने काम करणार असेल तर देशात लोकशाही राहील का असा प्रश्न लोकांना पडला आहे. दहशतीचे वातावरण तर आहेच पण सत्ताधाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर केला गेला. माझ्या मतदारसंघामध्ये शिंदे गट आणि भाजपने एका-एका मतासाठी ५ हजार रुपये वाटले गेले. एवढा मोठा पैसा वाटून निवडणूक खेळली जात असेल तर हे योग्य नाही. ठीक आहे पण लोकं योग्य निर्णय घेतील.

## विशेष सूचना




दैनिक जनता आवाज

**नमस्कार अहिल्यानगरकर!**

**महानगरपालिका निवडणुका** लवकरच होणार आहेत. या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुक उमेदवार प्रभागातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. नागरिकांचा आवाज समोर आणण्यासाठी **'दैनिक जनता आवाज'** या मालिकेत आम्ही रोखठोक सदर सुरू करत आहोत. या रोखठोक सदरात, आपण प्रभागातील समस्यांवर थेट भाष्य करू शकता, आपल्या अपेक्षित विकासकामांचा मागणी करू शकता, आणि प्रशासनासाठी सूचना देऊ शकता. रस्ते आणि ट्रॅफिकची दुरवस्था, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि आरोग्य सुविधा, महिलांची सुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांची अडचण, इतर प्रलंबित समस्या.

**- : महत्त्वाचे :-**

**आपली नावे पूर्णपणे गोपनीय राहतील.**

**फक्त मुद्दे जाहीर केले जातील.**

आपल्या समस्या आणि सूचना पाठवण्यासाठी संपर्क : ८८९६७११७११ आपला आवाज थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी **'रोखठोक सदर दैनिक जनता आवाज'** तयार केले आहे. आपली मते मांडणे हीच खरी लोकशाही!

**आपला आवाज : आमचे व्यासपीठ!**

# कोपरगावातील उर्वरित पाझर तलाव भरण्याचा मार्ग मोकळा

## आ. आशुतोष काळे; 'निळवंडे'च्या ३.७ किलोमीटर पूरचारी डिझाईन व अंदाजपत्रकाच्या कामाचा कार्यारंभ आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : रांजणगाव देशमुख, अंजनापुर व बहादरपूर येथील अंजनापुर पाझर तलाव क्र.३ ते मंगलमुर्ती कार्यालयापर्यंत १.२ कि.मी. व निळवंडे कालवा टेल ते खोकडविहीर २.५ कि.मी. अशा एकूण ३.७ किलोमीटरच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे डिझाईन व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश प्राप्त झाला असून त्यामुळे राहिलेले पाझर तलाव भरण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.

निळवंडेचे पाणी प्रत्येक गावात पोहोचविण्यासाठी वेळोवेळी पदरमोड करून खर्च केल्यामुळे प्रत्येक गावाला चाऱ्या नसतांना देखील पाणी पोहोचविले. परंतु कायमस्वरूपी उपाययोजना व्हाव्यात, यासाठी पूर चारीच्या सर्वे क्षण कामाची वर्क ऑर्डर लवकरात लवकर प्रसिद्ध होवून प्रत्यक्षात कामाला देखील तातडीने सुरुवात व्हावी. या उद्देशातून करीत असलेल्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.



निळवंडे कालव्यांच्या कामांना गती देण्यासाठी मा. खा. स्व. कर्मवीर शंकररावजी काळे व माजी आमदार अशोकराव काळे यांनी देखील विरोधी पक्षाचा आमदार असतांना त्यांच्या कार्यकाळात निळवंडेच्या कामाला गती देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. २०१९ च्या विधानसभा निवडणूक प्रचारा दरम्यान आ. आशुतोष काळे यांनी निळवंडे कालव्याच्या कामाला गती देणार असल्याचा शब्द निळवंडे डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील काकडी, मल्हारवाडी, डांगेवाडी, मनेगाव, रांजणगाव देशमुख, वेस, सोयेगाव, अंजनापूर, बहादरपूर, धोंडेवाडी, जवळके, शहापूर आदी गावातील नागरीकांना दिला होता. त्याप्रमाणे जलसंपदा विभागाकडून ३.७ किलोमीटरच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे (पूरचारी) डिझाईन व अंदाजपत्रक बनण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे त्यामुळे या गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. पाठपुराव्याची दखल घेवून बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे (पूरचारी) डिझाईन व अंदाजपत्रक बनण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याबद्दल आ. काळे यांचे आभार मानले आहे.

> रांजणगाव देशमुख, अंजनापुर व बहादरपूर येथील अंजनापुर पाझर तलाव क्र.३ ते मंगलमुर्ती कार्यालयापर्यंत १.२ कि.मी.व निळवंडे कालवा टेल ते खोकडविहीर २.५ कि.मी. अशा एकूण ३.७ किलोमीटरच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे (पूरचारी) डिझाईन व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामाला आ. काळे यांच्या प्रयत्नातून गती मिळाली. त्यामुळेच या कामाचा कार्यारंभ आदेश प्राप्त होवून निळवंडे कालव्यातून रांजणगाव देशमुख, अंजनापूर, बहादरपूर, धोंडेवाडी,जवळके, बहादराबाद व शहापूर येथील पाझर तलावांमध्ये बंदिस्त पाईपलाईनने (पूरचारी) पाणी आणण्याचे काम सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
>
> **– गोपीनाथ रहाणे, सरपंच – बहादरपूर**

# सावेडी जॉगिंग ट्रॅकची सुरक्षा भिंत कोसळली

## महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष; नागरिकांचा गांधीगिरीने निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सावेडी उपनगरातील दिनूभाऊ कुलकर्णी क्रीडांगण येथील जॉगिंग ट्रॅकची सुरक्षा भिंत कोसळून अनेक दिवस उलटले. मात्र मनपा प्रशासनासह प्रभाग क्रमांक तीनच्या स्थानिक माजी नगरसेवकांनी या गंभीर प्रश्नाकडे कानाडोळा केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

रोज सकाळ-संध्याकाळी व्यायामासाठी येणारे ज्येष्ठ नागरिक, खेळाडू व विद्यार्थी यांना जीव मुठीत धरून ट्रॅकचा वापर करावा लागत असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



भिंत कोसळल्यानंतरही कोणतीही दुरुस्ती न झाल्याने आज सावेडीकरांनी अनोखी गांधीगिरी करीत कोसळलेल्या भिंतीला हार घालून निषेध व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सुमित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात प्रशासनाची व माजी प्रतिनिधींची निष्क्रियता दिसली. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष केतन क्षीरसागर, गजानन भांडवलकर, विशाल मस्के, विनोद पाचरणे, शेखर जोशी, अर्जुन मदन, रोहीत सर्णा, सुरज गोटे आदी उपस्थित होते.

> **मोठी दुर्घटना होण्याची शक्यता!**
>
> सावेडी जॉगिंग ट्रॅक परिसरातील परिस्थिती गंभीर असून तात्काळ दुरुस्ती न झाल्यास मोठी दुर्घटना होण्याची भीती नागरिकांत व्यक्त होत आहे. तर याच्यात एखादी दुर्देवी घटना किंवा बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार आहे का? असा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाने याबाबत त्वरीत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# राहात्यात प्रशासकीय कौशल्य विकासाला चालना

## राहाता तालुकास्तरीय शिक्षक, अधिकारी, कर्मचारी स्पर्धा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : शैक्षणिक क्षेत्रातील नवोन्मेष, डिजिटल साक्षरता, भाषिक अभिव्यक्ती आणि प्रशासकीय कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी आयोजित राहाता तालुकास्तरीय शिक्षक, अधिकारी व कर्मचारी स्पर्धा यंदा भव्यदिव्य उत्साहात पार पडल्या.

दि. ७ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत न्यु इंग्लिश स्कूल पिंप्री निर्मळ आणि पीएम श्री जिल्हा परिषद शाळा शिर्डी (मराठी) येथे तब्बल ४३ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधून राहाता तालुक्यातील शैक्षणिक व्यावसायिकांची गुणवत्ता, सर्जनशीलता आणि कार्यक्षमतेचा अनुपम आविष्कार पाहायला मिळाला.




स्पर्धांची संकल्पना प्राचार्य डॉ. राजेश बनकर, लक्ष्मण सुपे, स्मिता कापसे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे व विस्तार अधिकारी भाऊसाहेब घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आली.

स्पर्धा समिती अध्यक्ष राजेश पावसे, विष्णूकांत कांबळे, स्मिता कापसे, कानिफनाथ कोळेकर, संजय नळे, सुनिल लोमटे, रंगनाथ खेमनर, लक्ष्मीकांत इडलवार यांनी स्पर्धांचे नियोजन करून उत्कृष्ट व्यवस्थापन सिद्ध केले.

कार्यक्रमाच्या परिक्षणात डॉ. शरद दुधाट, डॉ. असिफ पठाण, प्रा. शरद गमे, प्रा. बाळासाहेब दिघे, प्रा. भाऊसाहेब थेटे, प्रा. सुनिल कांडेकर, सुनिल लोमटे, प्रतीक्षा काळे, निताली रोहोम यांनी उच्च दर्जाचे निकष वापरून निवड प्रक्रियेचे मनोयोगाने काम केले.

> **स्पर्धकांकडून उत्तुंग कामगिरीची अपेक्षा**
>
> प्रतिभोत्सवामुळे राहाता तालुक्यात नव्या ऊर्जा, सर्जनशीलता आणि शैक्षणिक गुणवत्तेची नवी लाट निर्माण झाली असून विभागस्तरावर निवडलेल्या स्पर्धकांकडून उत्तुंग कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जीवनात मैदानी खेळ म्हणजे औषध : शेंडे

## अहिल्यानगर बार असोसिएशनचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जीवनात मैदानी खेळ हे औषधाप्रमाणे असतात. खेळामुळे दैनंदिन ताण-तणाव कमी होतो, सकारात्मक वृत्ती वाढते आणि कामाचा उत्साह टिकून राहतो, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

अहिल्यानगर बार असोसिएशनतर्फे आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सव २०२५ वाडियापार्क क्रीडा संकुलमध्ये अत्यंत उत्साहात पार पडला. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

उद्घाटन सोहळ्याला जिल्ह्यातील विधीज्ञ, सरकारी वकील आणि बार असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या क्रीडा महोत्सवाला वकील बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, तर महिला वकीलही यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, सरकारी वकील अनिल घोडके, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे पाटील, उपाध्यक्ष ड. वैभव आघाव यासह आदी वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रीडा महोत्सव यशस्वीतेसाठी बार असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. अभिजित देशमुख, ॲड. निखिल ढोले, ॲड. दिपक आडोळे, ॲड. शिवाजी शिंदे, ॲड. विजय केदार, ॲड. ज्योती हिमने यांनी विशेष परिश्रम घेतले.

> महिलाही सर्वच खेळांमध्ये आघाडीवर असून, या महोत्सवात महिला वकील मोठ्या संख्येने सहभागी झाल्या याचा आनंद आहे. स्पर्धा जिंकणे हाच उद्देश नसतो; सहभाग, शिस्त आणि टीम स्पिरिट हीसुद्धा तितकीच महत्त्वाची मूल्ये आहेत. वकिली करताना खेळाडू वृत्ती महत्त्वाची ठरत आहे.
>
> **– अंजू शेंडे,**
> जिल्हा व सत्र न्यायाधीश

# नायब तहसिलदार क्षिरसागर दोष मुक्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दि. ३० ऑक्टोबर २०१० रोजी फटाका विक्री तात्पुरता परवाना काढण्यासाठी ५६ व्यापाऱ्यांकडून प्रत्येकी दोन हजार रुपये याप्रमाणे रुपये एक लाख बारा हजार स्वतःसाठी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी स्विकारले म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला. त्याहुन त्यांच्या विरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात वरीष्ठ अधिकारी यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये आवश्यक असलेली पुर्व मंजूरी नाकारण्यात आली होती. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी नगर न्यायालयात दोष मुक्त करण्यासाठी अर्ज दाखल केला असता तो यापुर्वीच मंजुर करण्यात आला.

# चांगल्या साहित्यकृती समाजासाठी दिशादर्शक

## डॉ. कळमकर; साहेबराव आवारे साहित्य पुरस्कारांचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सूक्ष्म निरीक्षण आणि चिंतनातून निर्माण होणाऱ्या साहित्यकृती या दिशादर्शन करतात. त्या साहित्यकृती निर्माण होणे, त्यांचा समाजाने देखील सन्मान केला पाहिजे. अक्षर प्रतिष्ठान सद्गुरू साहेबराव आवारे यांच्या नावे पुरस्कार देऊन हे काम करीत आहे, असे मत ख्यातनाम साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केले.

जेऊर बायजाबाई येथे सद्गुरू साहेबराव आवारे गुरुजींच्या अमृत महोत्सवानिमित्त अक्षर साहित्य प्रतिष्ठानच्या पुरस्कार वितरण प्रसंगी डॉ. कळमकर बोलत होते.



> संत साहित्य आणि वारकरी परंपरा हे फक्त धार्मिक व्यवहार नाहीत, तर मानवी जीवनाचा उत्कर्ष घडवणारे तत्त्वज्ञान आहे. आवारे गुरूजींचे कार्य मोठे आहे. त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आध्यात्मिक कामाचा सुगंध परिसरात दरवळत आहे. त्यांच्या नावाचा पुरस्कार ज्ञानपीठ व साहित्य अकादमी इतकाच मानाचा आहे. समाजात कर्ते सुधारक आणि बोलके सुधारक होते. आवारे गुरूजी हे कर्ते सुधारक आहेत.
>
> **– डॉ. संजय कळमकर, जेष्ठ** साहित्यिक

यावेळी पुरस्कार निवड समितीचे सदस्य कवी प्रा. शशिकांत शिंदे, डॉ. संजय बोरुडे, अक्षरचे अध्यक्ष सिद्धिनाथ मेटे, उपाध्यक्ष कार्याध्यक्ष प्रा. हेमलता पाटील, नवनाथ मगर, संदीप शेटे, ॲड. विनायक तोडमल, ज्योतिष अभ्यासक संतोष घोलप, साहित्यिक सचिन चोभे, आत्मनिर्धारचे महादेव गवळी आदी उपस्थित होते.

# शिव आराधना प्रवचनास भाविकांची गर्दी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येथील अयप्पा मंदिरात मंडल- मकरविलक्कु या वार्षिक उत्सवास सुरवात झाली आहे. त्यानिमित्त रोज धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन अय्यप्पा सेवा समितीच्या वतीने करण्यात येत आहे. यावेळी भाविकांची मोठी गर्दी हिट आहे. या उत्सवा ३ दिवसीय दिव्य ज्योती जागृती संस्थानद्वारे भगवान शिव आराधना या प्रवचनाचे आयोजन सायंकाळी करण्यात आले आहे. अमोघनंद महाराज हे शिव कथा सांगून भाविकांना मार्गदर्शन करत आहे.



दुसऱ्या दिवशी त्यांनी भक्ती काय आहे, यासंबंधी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, मंदिराची संख्या वाढत आहे. ९५ टक्के लोक देवाला मानत आहे. पण यामधील ५ टक्के भाविकांचे मन निर्मळ आहे. त्यांच्या घरात भगवान आहे. जे मानवासारखे वागतात. मग बाकीचे ९० टक्के शुद्ध आचरण न करता नियमावली पाळत नाही. त्यासाठी मनापासून भक्ती करा.

दिव्य ज्योति जाग्रति संस्थान एक सामाजिक व आध्यात्मिक संस्था आहे. संस्थानचे संस्थापक व संचालक सर्वश्री आशुतोष महाराज असुन संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक व आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. याच श्रृंखले अंतर्गत शिव आराधन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

# राहात्यात सरासरी ७८.४८ टक्के मतदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राहाता नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत मंगळवार दि २ डिसेंबर रोजी कुठलाही अनुचित प्रकार न घडता शांततेत मतदान प्रक्रिया संपन्न झाली या निवडणुकीत १९ हजार ४५६ पैकी १५ हजार २६७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला तर राहाता शहरात सुमारे ७८.४७ टक्के इतके मतदान झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा राशिनकर यांनी दिली.

राहाता नगरपरिषद निवडणुकीचे नगराध्यक्षपद व २० नगरसेवक पदांसाठी झालेल्या निवडणुकीत मतदारांनी मोठा उत्साह दाखविला. सकाळी साडेसात वाजता मतदानात सुरुवात झाली होती. सुरुवातीच्या टप्प्यात धिम्यागतीने मतदान सुरू झाले, त्यानंतर मतदारांनी मतदान केंद्रावर गर्दी करण्यास सुरुवात केल्याने मतदानाची गती वाढत गेली. एकूण दहा प्रभागांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी मतदान केंद्र ठेवण्यात आले होते. प्रभाग क्रमांक दोन, चार व आठ यामध्ये बॅलेट युनिटमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने या ठिकाणी त्या अडचणी दूर करून प्रशासनाने बॅलेट युनिटची व्यवस्था केली. नगरपरिषद निवडणुकीकरता मतदारांनी मोठा उत्साह दाखविला प्रभाग क्रमांक सहा, सात, पाच, आठ व दहा या मधील उत्सुकता अनेक उमेदवारांना असल्याने तसेच येथील मतदार अत्यंत सुज्ञ असल्याचे बोलले जात असल्याने या प्रभागात दिग्गज नेतृत्वाच लक्ष लागून होते.

दुपारनंतर मतदार केंद्रांवर मतदारांच्या गर्दीचा ओघ वाढला, त्यामुळे रात्री उशिरापर्यंत अनेक मतदार केंद्राबाहेर मतदारांच्या लांब वर रांगा लागलेल्या होत्या. अत्यंत शांततेत मतदान संपन्न झाले. मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास मनाई असल्याने मतदारांची तसेच उमेदवारांची व त्यांच्या प्रतिनिधींची मोबाईल सांभाळण्यासाठी मोठी धांदल उडाली. काही नागरिकांनी या सदर्भात यापुढे मोबाईल बंदी असल्यास शासनाने मतदान केंद्राबाहेर मोबाईल लॉकरची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी अशी मागणी माध्यमांकडे व्यक्त केली. मतदारांच्या बाबतीत विचार केला तर अनेक मतदारांची नावे या वार्डातून त्या वार्डात होती, त्यामुळे मतदारांना स्वतःचे मतदान केंद्र शोधण्यात मोठी कसरत करावी लागली. त्यामध्ये अनेक मतदारांपर्यंत मतदानाच्या स्लिप न गेल्याने बहुतांशी मतदारांना आपल्या मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागले असल्याची खंत काही मतदारांनी उमेदवारांना बोलून दाखविली. प्रभाग क्रमांक पाच, सहा, सात, आठ व दहा या ठिकाणी मतदारांची प्रचंड गर्दी बघायला मिळाली. उमेदवारांनी ठेवलेल्या बुधवर मतदार प्रचंड गर्दी करताना दिसले. अनेक ठिकाणी मतदारांना मतदान करताना गोंधळ उडत असल्याचे दिसून आले. बॅलेट युनिटवर मतदान प्रक्रिया करताना ती समजून देण्याची आवश्यकता होती, मात्र त्यात प्रशासन कमी पडले असल्याचे दबक्या आवाजात लोक बोलत आहे. राहाता नगरपरिषदेच्या दहा प्रभागांचा विचार केला तर प्रभागनिहाय झालेले मतदान पुढील प्रमाणे-

**प्रभाग क्रमांक १ मध्ये** १८८४ पैकी १५४४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून ८२% इतके मतदान झाले आहे. **प्रभाग क्रमांक २ मध्ये** १८२५ मतदानापैकी १४३५ इतके मतदान झाले. येथे ७८% **प्रभाग क्रमांक ३ मध्ये** १९२६ पैकी १६०७ मतदान झाले ८५ % **प्रभाग क्रमांक ४ मध्ये** २१६० पैकी १६९५ मतदान झाले. ७८% **प्रभाग क्रमांक ५ मध्ये** १७६७ मतदारांपैकी १३८२ मतदान झाले ७८%, **प्रभाग क्रमांक ६ मध्ये** २०६४ पैकी १६२८ झाले असून ७८%, **प्रभाग क्रमांक ७ मध्ये** २०६० पैकी १५७८ झाले ७५%, **प्रभाग क्रमांक ८ मध्ये** १९२२ पैकी १३८५ झाले ७२ टक्के, **प्रभाग क्रमांक ९ मध्ये** १७६८ पैकी १३५५ मतदान झाले ७६%, **प्रभाग क्रमांक १० मध्ये** २ २०८० पैकी १६५८ अर्थात ७९% याप्रमाणे मतदान प्रभाग निहाय झाले आहे.



निवडणूक शांततेत व सुरळीत पार पाडणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा राशिनकर, सहाय्यक निवडणूक आयोग अधिकारी तथा तहसीलदार अमोल मोरे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा राहाता नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे तसेच पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया कुठलाही अनुचित प्रकार न घडता शांततेत संपन्न झाली.

निवडणूक झाली, मात्र मतमोजणीचे काय अशी चर्चा प्रत्येक बुथवर व मतदारांमध्ये दिसून येत होती. निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया लांबणीवर गेल्याने २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची चर्चा होती. या चर्चेमुळे मतदारांसह काही उमेदवारांवर निरुत्साहाची छाया पसरली आहे, तर काहींच्या काळजाचे ठोके वाढताना दिसत आहे. २१ तारखेपर्यंत अनेकांना आता व्हेंटिलेटरवर राहण्याची वेळ आली आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# नेवासाखडका रोड नागरिकांच्या जीवाशी खेळ

## निकृष्ट कामात डांबर गायब! थरावर थर टाकल्याने घरे-दुकाने खड्ड्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा ते खडका फाटा या मार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक नियमांचा गंभीर भंग झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. जुना रस्ता न खोदता, त्यावर आवश्यक डांबर न टाकता केवळ खडीचा थर टाकण्यात आला आहे.

परिणामी रस्त्याचा दर्जा निकृष्ट होत असून, रस्त्याची उंची वाढल्याने परिसरातील घरे व दुकाने खड्ड्यात गेल्याचे दृश्य दिसत आहे. यामुळे पावसाळ्यात पाणी घरात शिरण्याचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून खड्डेमय असलेला खडका रस्ता आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या पाठपुराव्याने सुरू झाला. हा रस्ता देवगड, मुरमे, खलालप्रिंपी यांसारख्या गावांना अहिल्यानगरछत्रपती संभाजीनगर महामार्गाशी जोडणारा महत्त्वाचा



मार्ग असल्याने, तो महामार्गापर्यंत मजबूत काम करणे गरजेचे आहे.

सध्या काझी वस्ती ते देवगड-पिंपरी रस्त्यापर्यंत खडीकरण सुरू असून, या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता दिसून येत आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते बांधकाम मानकांनुसार, जुना व खराब थर पूर्णपणे काढून योग्य बेस तयार करणे बंधनकारक असते. मात्र या कामात जुना थर न काढता व डांबर न टाकता थेट खडी टाकण्यात आल्याने रस्ता असमतोल व ओबडधोबड झाला आहे.

काही ठिकाणी डांबराचा वापर अत्यल्प असून, जिथे त्याची जास्त गरज आहे तिथे तो पूर्णपणे गायब आहे. रस्त्याला कोणतीही लेव्हल नसल्याने काही ठिकाणी अचानक चढ आणि तीव्र उतार मध्येच चढ तयार झाले असून, वाहनचालक व दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे.

निकृष्ट कामामुळे हा रस्ता काही दिवसांतच उखडेल, अशी शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अभियंत्यांनी तातडीने पाहणी करून सदोष काम थांबवावे व तांत्रिक नियमांनुसार दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. तसेच संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### शासकीय खर्च वाया जाण्याची भीती

जुना थर न काढता नवीन थर टाकणे हे अभियंतिकी नियमांनुसार दोषपूर्ण काम मानले जाते. या रस्त्याच्या कामात डांबराचा वापर अत्यंत कमी किंवा आवश्यकतेनुसार केला गेलेला नाही. तसेच योग्य मोजमाप न घेता ओबडधोबड पद्धतीने काम सुरू असल्याचा आरोप आहे. त्यामुळे रस्त्याचे आयुष्य कमी होऊन शासनाचा मोठा आर्थिक खर्च वाया जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# ‘मिशन आपुलकी’ शाळेच्या विकासाचा कणा

## गटशिक्षणाधिकारी शेख; धारणगावात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : गटशिक्षणाधिकारी शबाना शेख यांनी मिशन आपुलकी ही एक लोकचळवळ होऊन शाळेच्या व गावाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत असल्याचे प्रतिपादन केले. शाळेच्या प्रांगणात माजी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुलींनी लेझीमच्या तालावर जंगी स्वागत केले आणि सर्वांचे औक्षण करण्यात आले. वैशाली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी शाळेच्या गीतावर सादर केलेल्या टिपरी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. माजी सरपंच दिपक चौधरी यांनी मुलांच्या टिपरी नृत्याचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुर्शतपूर शाळेच्या मुख्याध्यापिका महामुनी यांनी भूषविले. यावेळी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका संगीता नाईक यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य, थोर नेत्यांचे फोटो व रोख रक्कम देऊन शाळेला मदत केली. तसेच विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केले. तसेच माजी उपसरपंच गणेश थोरात, महामुनी, माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळू मोरे आणि अंगणवाडी सेविका वनिता चौधरी यांनी शाळेला आर्थिक मदत सुपूर्द केली. या कार्यक्रमास सोपान वहाडणे, सरपंच दिपक चौधरी, उपसरपंच बाबासाहेब वाघ, रमाकांत वाकचौरे, ग्रामपंचायत सदस्य सुरज रणशूर, माजी उपसरपंच गणेश थोरात, शंकर रणशूर, सुभाष रणशूर, अनिल वहाडने, माजी शा.व्य.स. अध्यक्ष बाळू मोरे, राकेश कदम, बाबासाहेब चौधरी, आरोग्यसेविका सुनिता भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# अधिवेशनात पेरू वाटप जनजागरण अभियान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : राज्यातील शेतरस्त्यांचा ज्वलंत प्रश्न गंभीर बनत असुन शेतकऱ्यांनी जमिनी गमावल्या, मुले शिक्षणापासून वंचित,शेतमालाचे नुकसान, फौजदारी स्वरूपाच्या घटना यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान टाळण्यासाठी आणि शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीतर्फे नागपुर हिवाळी अधिवेशनात भव्य लक्षवेधक पेरू वाटप जनजागरण अभियान आयोजित केले जाणार आहे.

यावेळी राज्यातील सर्व पक्षीय आमदार आणि मंत्री यांना ‘शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी’ टोप्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये शासननिर्णयांच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी शेतकऱ्यांचे महाराष्ट्रातील सर्व शिवरस्ते एक वर्षाच्या आत हद्द निश्चित वा खुले करून, ग्रामसडक योजनेअंतर्गत मजबुतीकरण तात्काळ करावे आदी मागण्या मांडण्यात येणार आहे.



> शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर सरकार प्रशासनाचे लक्ष वेधन्यासाठी नागपुर विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारावर लक्षवेध पेरू वाटप , अभियान राज्यातल्या सर्व आमदारांना शेतरस्ता जागृती टोपी व लक्षवेधीसाठी पत्रक वितरण करून विधानभवन प्रांगणात सह्यांची मोहीम घेवून चळवळीच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले जाणार आहे .
>
> **- शरद पवळे.**

या विषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, गृहविभाग यांना निवेदन पाठवण्यात आले. निवेदन सुपूर्द करताना महसूलचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्याकडे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, ॲड. सागर जोरी, जेष्ठ पत्रकार शिवाजी राऊत, शांताराम पानमंद, सचिन शेळके, रामहरी बोंबे, दशरथ वाळूंज, संजय साबळे, सुरेश भुजबळ, भाऊसाहेब वाळूंज, बबन गुंड, संजय जाधव यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# राखीव निधी खर्च न केल्याचा आरोप

## आंबेडकर भवन दुरुस्तीची मागणी ठाम




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : निवडुंगे (ता. पाथर्डी,) येथील मागासवर्गीयांसाठी राखीव असलेला १५ टक्के निधी खर्च न केल्याच्या आरोपावरून वंचित बहुजन आघाडीने पुन्हा आक्रमक भूमिका घेतली असून १६ डिसेंबर रोजी अहिल्यानगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. युवा तालुका अध्यक्ष आकाश इंद्रजीत शिंदे यांनी या संदर्भात निवेदन दिले. यापूर्वी पंचायत समिती कार्यालयावर आंदोलन करताना गटविकास अधिकारी यांनी एक महिन्यात अहवाल देऊन महाराष्ट्र पंचायत राज अधिनियम अन्वये संबंधितांवर कारवाई करू, असे लिखित आश्वासन दिले होते. मात्र दोन महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने आघाडीतील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. निवेदन देताना आकाश इंद्रजीत शिंदे यांच्यासोबत सुभाष शिंदे, दयानंद शिंदे, योगेश साळवे, लता साळवे, योगिता खाते, आदित्य कोकणे, अनिल शिंदे, मनोहर चव्हाण, शाम तिजोरी, सुनील साळवे यांसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### आंदोलनाचा दिला इशारा

यासंदर्भात दलित समाजाने गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी मागणीत नमूद केले आहे की, जोपर्यंत आंबेडकर भवनाची दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत दलित वस्तीमध्ये कुठल्याही प्रकारचा निधी खर्च करण्यास आम्ही परवानगी देणार नाही. तसेच, दुरुस्ती लवकर न झाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रा. किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे.

# दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र पारायण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : शहरातील पाटील गल्ली येथील संत सदूरु गोदड महाराज जन्मस्थळ मंदिरात दत्त जयंतीनिमित्त दिंडोरी प्रणित स्वामी समर्थ केंद्रामार्फत आयोजित गुरुचरित्र पारायण सोहळा व अखंड नामजप सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तालुक्यात सर्वत्र दत्त जयंती साजरी करण्यासाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

लक्ष्मण तनपुरे उर्फ आबा यांनी सांगितले की, दत्त जयंतीनिमित्त सुरू असलेल्या गुरुचरित्र पारायणात विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय आहे. याज्ञिकी सेवा, अखंड वीणा, नामजप, होम-हवन आदी सर्व धार्मिक विधी त्या पार पाडत आहेत. रात्रीच्या प्रहरातील सेवा मात्र पुरुष भाविक करत असून सर्वच सेवेकऱ्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिंडोरी प्रणित या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून सर्व विधी महिला सेवेकरी पूर्ण करतात हे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. या सप्ताहामध्ये भांडेवाडी, भैरोबावाडी, शहाजीनगर, कुळधरण, दिघी, कोरेगाव, बेलेकर वसाहत या केंद्रातील भाविक उपस्थित राहत आहेत.

# गुंडेगाव भागात सायंकाळनंतर थंडीमुळे शुकशुकाट

## लोक घराबाहेर पडणे टाळत घरातच थांबतात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वाळकी** : मागील आठ दिवसांपासून अहिल्या नगर तालुक्यातील वाळकी,गुंडेगाव परिसरात हवेतील गारठा वाढला असुन शेती व परिसरातील हिरवाईमुळे या थंडीत अजुनच वाढ होत आहे. थंडी वाढल्याने नागरिक शाल,स्वेटर,कानपट्टीचा वापर करत आहेत.त्यातुनही थंडी पळाली नाही तर शेकोटीचा आधार घेतला जात आहे. नोव्हेंबर डिसेंबर मध्येच तालुक्यातील गुंडेगाव, वाळकी देऊळगाव, राळेगण थंडीच्या तीव्रतेने नागरिकांमध्ये हुडहुडी भरली आहे.

नोव्हेंबर महिन्यापासून यंदा मोठ्या प्रमाणात थंडी जाणवू लागली असून थंडीमुळे दिवसभराच्या सत्रात शेती कामे उरकून घेण्याकडे बळीराजाचा कल वाढला आहे. नेहमी वर्दळ असलेले रस्ते निर्मनुष्य होत आहेत.गावांमध्ये सायंकाळीच सहा ते सात वाजताच रस्त्यावर शुकशुकाट पहायला मिळत आहे.यातच डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात थंडीची तीव्रता अधिक वाढणार असल्याने थंडी पासून संरक्षणासाठी शेतकरी विविध उपाययोजना करत आहेत.

चार दिवसांपूर्वी कमी झालेली थंडी रविवारी पुन्हा जोरदार परतली असून दिवसभर बदलत्या हवामाना नंतर रात्री व पहाटे थंडीची स्पष्ट जाणीव होत असून तापमानातील घट ग्रामीण भागात जाणवण्याइतकी ठळक दिसत आहे.आर्द्रतेचे प्रवाह कमकुवत झाल्याने हवेत गारवा वाढला असून वातावरणात थंड हवा वाढल्याचं दिसून येत आहे. थंडीच्या तडाख्याने गुंडेगाव, वाळकी, देऊळगाव, राळेगणकरांना चांगलीच हुडहुडी भरलेली दिसत आहे. दिवसभर अधूनमधून ऊन-ढगांचा खेळ सुरू असताना सायंकाळी सूर्यास्तानंतर गुंडेगाव परीसरात थंडीची चाहूल लागत गारव्यामुळे हुडहुडी भरत आहे.

कोरोना काळात जसे रस्ते निर्मनुष्य झाले होते.त्याच पध्दतीने सायंकाळी रस्त्यावरील गर्दी कमी होताना दिसत आहे. सध्या लग्नसराईचा हंगाम असतानाच वाढलेल्या थंडीमुळे लग्नसोहळ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

थंडीमुळे नेहमी गजबजलेल्या चौकात शुकशुकाट आहे. नेहमी वर्दळीच्या मार्गावर लोकांची संख्या तुरळक झाली आहे. थंडीमुळे गावे गारठलेली पहायला मिळत आहेत.पुढील दोन महिने ही थंडी माणसांसह वन्यप्राणी, जनावरांसाठीही अडचणीचा ठरणार आहे.



> थंडी वाढल्यानंतर गावातील नागरिकांनी उबदार कपड्यांचा आश्रय घेतला आहे. स्वेटर, जॅकेट, कानटोपी यांचा वापर वाढला असून शेकोट्या पेटवून उब घ्यावी लागत आहे.सकाळी फिरणारे नागरिक, व्यायाम करणारे तरुण यांना वाढलेली थंडी विशेष जाणवत आहे.त्यामुळे गावात लवकरच शुकशुकाट होत आहे. तसेच लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना गारवा त्रासदायक ठरत आहे.
>
> **-नाना सोनवणे, व्यवसायिक, गुंडेगाव**

# चेअरमनपदी माणिक विधाते यांची बिनविरोध निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हा. चेअरमनपदी प्रा. माणिक विधाते यांची संचालक मंडळांनी एकमताने बिनविरोध निवड केली असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी काम पाहिले, प्रा. माणिकराव विधाते यांच्या व्हॉइस चेअरमन पदाच्या नावाची सूचना संचालक निखिल नहार यांनी मांडली.

तर अनुमोदन संचालक डॉ. भूषण अनभुले यांनी दिले. यावेळी बँकेचे चेअरमन सीए गिरीश घैसास, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, अशोक कानडे, संजय घुले, सुजित बेडेकर, शिवाजी कदम, संचलिका रेश्मा आठरे, स्वाती कांबळे, संचालक डॉ. भूषण अनभुले, प्रदीप जाधव, दत्तात्रय रासकोंडा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, कर्मचारी प्रतिनिधी संतोष मखरे, राजेंद्र गायकवाड, वरिष्ठ अधिकारी प्रकाश वैरागर, वरिष्ठ लिपिक महेश पालवे व देविदास पारधे, अनिल मुरकुटे गणेश गोडाळ आदी उपस्थित होते. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी प्राध्यापक माणिकराव विधाते यांची अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमन पदावर निवड झाल्याबद्दल सत्कार करून अभिनंदन केले.

प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, शहर सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने व्हाईस चेअरमन पदावर माझी निवड केली त्या निवडीला सार्थ ठरवीत बँकेच्या हितासाठी चांगले काम केले जाईल, शहर सहकारी बँकेला ५४ वर्षांची उज्वल परंपरा आहे, अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे शहर बँकेशी ऋणानुबंध जोडले आहेत, असे ते म्हणाले.

# गुरुदत्त मंदिराचा तपपुर्ती सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : निघोजच्या लाळगे मळ्यातील दत्तनगर मधील गुरुदत्त मंदिराचा तपपुर्ती सोहळ्यानिमित्त १२ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून परिसरात धार्मिक व भक्तीमय वातावरणाची निर्मिती होणार असल्याची माहिती गुरुदत्त सेवा ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे. वैकुंठवासी हभप डॉ. नामदेव महाराज सारंग व ज्येष्ठ किर्तनकार शिवाजी महाराज लामखडे यांच्या आशिर्वादाने बुधवार दि. ३ रोजी सकाळी ११ वाजता निघोज येथून नारायणपूर येथे महाज्योत आणण्यासाठी प्रस्थान केले जाईल व पुन्हा तेथून महाज्योत गुरुवार दि. ४ रोजी सकाळी ८. ३० वाजता निघोज येथे आगमन होऊन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. युवा किर्तनकार बाळकृष्ण महाराज डांगे, संगमनेर येथील प्रति इंदुरीकर रविंद्र महाराज पिंपळगावकर, श्री क्षेत्र आळंदी देवाचे येथील विनोदाचार्य हभप महेश अप्पा मडके पाटील, यवतमाळ येथील हभप कांचनताई शिवानंद शेळके यांचे हरी किर्तनकार तर कर्जत येथील किर्तन केशरी हभप विकास महाराज देवडे यांचे सोमवार दि. ८ रोजी सकाळी ९ ते ११ वाजता काल्याचे किर्तन आयोजीत करण्यात आले आहे.

## सायटेशन नोटीस

दि ०१/१२/२०२५

प्रो.फी.जमा.रु.
पान नं.

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

चौ.अ.नं. १६४/२०२५

**अर्जदार**-श्री. रशीद यासीन शेख रा तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**-ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांची स्वतःचा जन्म मौजे तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे १०-०६-१९८४ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःचा जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःचा जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत तिसगाव ता. पाथर्डी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दिनांक १५/१०/२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत दिनांक १६/१२/२०२५ पुर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

शिक्का

**हुकुमावरुन्**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

## सायटेशन नोटीस

दि.०१/१२/२०२५

प्रो.फी.जमा.रु.
पान नं.

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

चौ.अ.नं. १६५/२०२५

**अर्जदार**-श्री. कासम नुराभाई शेख रा तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**-ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांची स्वतःचा जन्म मौजे तिसगाव ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे ११-१२-१९८० रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःचा जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतःचा जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत तिसगाव ता. पाथर्डी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दिनांक १५/१०/२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत दिनांक १६/१२/२०२५ पुर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

शिक्का

**हुकुमावरुन्**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

## सायटेशन नोटीस

दि०२/१२/२०२५

प्रो.फी.जमा.रु.
पान नं.

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

चौ.अ.नं. १२८/२०२५

**अर्जदार**-श्री. रुबिना निजामुद्दीन शेख रा पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**-नगरपरिषद पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांची स्वतः हिचा जन्म मौजे पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे ०१-०६-१९७४ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय पाथर्डी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय पाथर्डी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतः जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे स्वतः जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाथर्डी ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत पाथर्डी ता. पाथर्डी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दिनांक २८/०८/२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय पाथर्डी ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत दिनांक १७/१२/२०२५ पुर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक ०२/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

शिक्का

**हुकुमावरुन्**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

## संपादकीय

# जलस्रोतांचे अस्तित्व धोक्यात येतेय...

वितळणाऱ्या हिमनद्या आणि बर्फाच्या माध्यमातून ताजे पाणी नद्या आणि इतर जलस्रोतांमध्ये मिसळते. हे पाणी जमिनीसाठी आणि मानवी जीवनासाठी आवश्यक असते. हवामानबदलामुळे त्यांचे संवर्धन महत्वाचे ठरते. कारण हवामानबदलाचे परिणाम नैसर्गिक जलस्रोतांचे संतुलन बिघडू शकतात. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक जल विकास अहवालात त्याबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. जगातील साठ टक्के गोड्या पाण्याचा पुरवठा करणारे पर्वतीय जलस्रोत आपल्या डोळ्यांसमोर कमी होत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) या अहवालात अनेकदा लपलेले सत्य उघड झाले आहे. जगातील जलसुरक्षा, पर्यावरण आणि अन्न पुरवठ्याचा मोठा भाग उच्च उंचीवर अवलंबून आहे. त्यांनाच सामान्यतः हिमालय किंवा आल्प्स पर्वतरांगा म्हणून ओळखले जाते. शास्त्रज्ञ आता याला 'पाण्याचे मनोरे' म्हणतात, तेच पृथ्वीला जीवन देणारे पाण्याचे खांब आहेत. अहवालानुसार, २००० ते २०२१ दरम्यान जागतिक गोड्या पाण्याचा वापर १४ टक्क्यांनी वाढला. त्यात शेती हा सर्वात मोठा ग्राहक आहे. एकूण वापराच्या सुमारे ७२ टक्के पाणी त्यासाठी लागते. औद्योगिक वापर १५ टक्के आहे आणि घरगुती वापर १३ टक्के आहे. विकसित देशांमध्ये औद्योगिक वापर जास्त आहे, तर गरीब देशांमध्ये शेतीसाठी ९० टक्क्यांपर्यंत पाणी वापरले जाते. वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पर्वतीय प्रदेशातील हिमनद्या मात्र वेगाने वितळत आहेत. हिमालयात जगातील काही सर्वात उंच पर्वत आणि अनेक हिमनद्या आहेत. या हिमनद्या आणि हिमनगांमधून वितळणारे पाणी एक अब्जहून अधिक लोकांना पाणीपुरवठ्यात योगदान देते. माउंट एव्हरेस्टसारख्या पर्वतांवरील बर्फ हळूहळू वितळतो आणि नद्या आणि झऱ्यांमध्ये वाहतो. त्यामुळे हे नैसर्गिक पाण्याचे मनोरे आसपासच्या भागांसाठी गोड्या पाण्याचे अमूल्य स्रोत बनतात. हिमालयात जगातील काही सर्वोच्च पर्वत आणि जगातील अनेक हिमनद्या आहेत. या हिमनद्या आणि त्यातून वितळणारे पाणी आजूबाजूच्या प्रदेशातील लोकांना पाणीपुरवठ्यात योगदान देते. एखाद्या शहरासाठी पाणी साठवून वितरित करण्यासाठी पाण्याच्या उंच टाक्या करत असलेले काम हिमालय मोठ्या प्रदेशासाठी करतो. हिमालय आशिया खंडाला पाणी पुरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने त्याला कधी कधी आशियाचे 'पाण्याचे टॉवर' म्हटले जाते. हिमालय हे नाव संस्कृत शब्दांपासून आले आहे. त्याचा अर्थ 'बर्फाचे घर' असा होतो. या विशाल विस्तारासाठी हे एक योग्य नाव आहे, कारण त्यात मोठ्या प्रमाणात बर्फ आहे. २,४०० किलोमीटर (१,५०० मैल) पेक्षा जास्त पसरलेला तसेच चीन, भूतान आणि नेपाळसारख्या अनेक देशांमध्ये वसलेला हिमालय हे एक प्रभावी ठिकाण आहे.

हिमालय पर्वत प्रणाली भारतीय उपखंड आणि तिबेट पठार यांच्यामध्ये एक अडथळा निर्माण करते. त्यात जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक हिमनद्या आहेत. त्याच्या मागे फक्त आर्क्टिक आणि अंटार्क्टिकाच्या हिमनद्या आहेत. यामध्ये एव्हरेस्टवर स्थित खुंबू हिमनदीचा समावेश आहे. ती जगातील सर्वात उंच हिमनदी आहे. यामुळे हिमालयाला अनेकदा 'तिसरा ध्रुव' म्हटले जाते. या हिमालयातील हिमनद्या आशिया खंडातील लोकांसाठी एक महत्त्वाचा स्रोत आहेत. हिमनद्या आणि हिमनगांचे वितळणारे पाणी आशियातील दहा नदीपात्रांमध्ये तसेच सिंधू आणि गंगा यासह अनेक प्रमुख नद्यांमधून वाहत राहते. बर्फ आणि हिमनद्यांचे हे वितळणे, मॉन्सूनच्या पावसासह एकत्रितपणे एक अब्जहून अधिक लोकांना पाणी पुरवते. ते कमी होण्याची भीती आता शास्त्रज्ञांना वाटते. शास्त्रज्ञ सध्या हवामानबदलाचा पर्वतांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करत आहेत. काही अभ्यासांमध्ये पर्वतरांगांच्या काही भागात बर्फाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले आहे. यामुळे काही शास्त्रज्ञांना अशी भीती वाटते, की हवामानबदलामुळे या प्रदेशात पाण्याची कमतरता निर्माण होऊ शकते. भारतीय भागातील हिमालयात ९,५०० हून अधिक हिमनद्या आहेत. 'वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयीन जिओलॉजी' आणि कानपूर येथील 'आयआयटी'ने केलेल्या अभ्यासातून दिसून आले आहे, की गेल्या तीन दशकांमध्ये या हिमनद्या दर वर्षी सरासरी १५ ते २० मीटर मागे सरकल्या आहेत. १९३५ पासून गंगोत्री हिमनदी सुमारे तीन किलोमीटर मागे सरकली आहे. या अहवालात इशारा देण्यात आला आहे, की नजीकच्या भविष्यात काही वर्षे नदीचा प्रवाह वाढू शकतो; परंतु दीर्घकाळात तो लक्षणीयरीत्या कमी होईल. हिमनदीच्या सरोवरांच्या उद्रेकामुळे होणाऱ्या आणि अचानक आलेल्या पुरांची समस्या सध्या वाढत आहे. २०२३ मध्ये सिक्कीममधील दक्षिण लोनाक सरोवराच्या उद्रेकामुळे आलेल्या पुरामुळे अनेक गावे आणि जलविद्युत प्रकल्प उद्ध्वस्त झाले. या आपत्तींसाठी देखरेख, पूर्वसूचना प्रणाली आणि आपत्तीपूर्व तयारी हे पर्वतीय धोरणाचा अविभाज्य भाग बनवण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे. भारताच्या ४० टक्क्यांहून अधिक कृषी क्षेत्र गंगा-ब्रह्मपुत्र खोऱ्यात आहे. तिथे तांदूळ, गहू आणि ऊस यांसारखी पाण्याची जास्त गरज असलेली पिके घेतली जातात. हिमनदी वितळण्यातील बदलांचा त्यांच्या उत्पादकतेवर थेट परिणाम होणे निश्चित आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, केवळ तांत्रिक उपायांवर अवलंबून राहणे हे पाणी संकटाचे निराकरण करण्यासाठी पुरेसे नाही. स्थानिक आणि पारंपारिक ज्ञान प्रणालींनाही समान महत्त्व दिले पाहिजे. भारताने आपल्या राष्ट्रीय जल धोरण, हिमालयीन हिमनदी देखरेख कार्यक्रम आणि हवामान अनुकूलन योजनांमध्ये पर्वतीय जलस्रोतांच्या संवर्धनावर भर दिला आहे. तथापि, अहवालात म्हटले आहे, की हे प्रयत्न सध्या मर्यादित आहेत आणि अधिक व्यापक, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्यापर्यंत विस्तारित करण्याची आवश्यकता आहे. ब्रह्मपुत्र आणि सिंधू खोऱ्यांसारख्या सामायिक जलस्रोतांबद्दल, भारत, नेपाळ, भूतान, चीन आणि बांगलादेश यांनी डेटा शेअरिंग, संयुक्त देखरेख आणि सामायिक अनुकूलन धोरणांवर एकत्र काम केले पाहिजे. अहवालात या संपूर्ण आव्हानाला 'शाश्वत विकास ध्येय सहा' शी देखील जोडले आहे. अहवालातील शेवटचे वाक्य एका इशाऱ्यासारखे वाटते. भारतासाठी भविष्यातील धोरण आणि आजचे निर्णय या दोन्हींबाबत पुनर्विचार करून हिमालयातील 'वॉटर टॉवर'च्या पुनरुज्जीवनावर व्यापक भर दिला नाही, तर शंभर कोटी लोकांच्या जीविताचाच प्रश्न निर्माण होईल, असे त्यात म्हटले आहे.

# वनस्पती आणि संगीताचे अनोखे भावविश्व

तंत्रवेध

– डॉ. दीपक शिकारपूर

वनस्पतींच्या वाढीवर प्रकाश, पाणी, तापमान यासारख्या भौतिक बाबींसोबतच ध्वनीलहरींचाही परिणाम होतो. म्हणूनच वनस्पती आणि संगीताच्या परस्परसंबंधांचा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे या काही उदाहरणांवरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' हा ज्ञानोबा माउलींचा विचार. सर जगदीशचंद्र बोस यांचा ठाम विश्वास होता की वनस्पतींमध्ये संवेदनशील मज्जासंस्था असते, ती प्राण्यांपेक्षा वेगळी नाही तसेच बाह्य उत्तेजनांवरील त्यांच्या प्रतिक्रिया मोजल्या जाऊ शकतात आणि त्या रेकॉर्ड केल्या जाऊ शकतात. जगातील प्रत्येक गोष्ट काही ना काही आवृत्तीच्या कंपाने बनलेली आहे. हिंदु तत्त्वज्ञानात 'ॐ' हा नाद सृष्टीचा मूलाधार मानला जातो. वनस्पती, प्राणी, मानव, पाणी, हवा सर्व एकाच नादात्मक ऊर्जेच्या स्वरूपातून निर्माण झाले आहेत. संगीत वातावरणात गुंजते, तेव्हा ही ऊर्जा जिवंत पदार्थाशी जोडली जाते. म्हणूनच संगीत वनस्पतींना 'जिवंत' वाटते; त्यातून परस्परसंवाद निर्माण होतो. मानवप्राण्याप्रमाणे वनस्पतींनाही आपल्या आयुष्यात अनेक सूक्ष्म संवेदना अनुभवता येतात, हे वैज्ञानिक संशोधनातून स्पष्ट झाले आहे. प्रकाश, पाणी, तापमान, वायू यासारख्या भौतिक गोष्टींसोबतच ध्वनीलहरींचाही वनस्पतींच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो. ध्वनी म्हणजे कंपन; आणि कंपन हा निसर्गाचा मूलभूत घटक आहे. संगीत हे अशा सुव्यवस्थित ध्वनीकंपनांचे सूक्ष्म रूप आहे. म्हणूनच 'वनस्पती आणि संगीत यांचा परस्पर संबंध' हा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. जगतातील प्रत्येक सजीव घटक काही ना काही प्रमाणात वातावरणातील कंपने अनुभवत असतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे ही याची काही उदाहरणे. यावरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.



ध्वनीलहरी हाही एक पर्यावरणीय घटक असल्यामुळे संगीतामुळे वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होतो का, याविषयी अनेक प्रयोग झाले असून त्यातून रोचक निष्कर्ष समोर आले आहेत. ध्वनी हा कंपनांद्वारे प्रसारित होणारा ऊर्जा-स्वरूप आहे. संगीत वाजते तेव्हा हवेमध्ये सूक्ष्म कंपने निर्माण होतात. काही संशोधकांच्या मते हे कंपन वनस्पतींच्या पेशींच्या भिंतींवर परिणाम करतात. कंपनांमुळे पेशींची उत्तेजना वाढते. ध्वनीलहरींमुळे वनस्पतींच्या पेशींमध्ये सूक्ष्म हालचाली निर्माण होतात. त्यामुळे वाढीसाठी आवश्यक असलेल्या एंझाइम्सची कार्यक्षमता वाढू शकते. यामुळे फोटोसिंथेसिस प्रक्रिया सुधारू शकते. काही प्रयोगांमध्ये संगीत सुरु असताना क्लोरोफिलचे प्रमाण अधिक वाढल्याचे निरीक्षण आढळले आहे. यातून ऑक्सिन आणि गिबरेलिनसारख्या वनस्पती हार्मोन्सच्या क्रियाशीलतेत फरक पडतो. त्यामुळे मुळांची आणि खोडांची वाढ बदलू शकते. वनस्पतींवर विभिन्न प्रकारच्या संगीताचा परिणाम होतो. संगीत अनेक प्रकारचे असते. शास्त्रीय, लोकसंगीत, रॉक, पॉप, वाद्यसंगीत इत्यादी. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वनस्पती प्रत्येक प्रकारच्या संगीताला समान प्रतिसाद देत नाहीत. अनेक प्रयोगांमध्ये आढळले की शांत, सुरेल आणि नादमय संगीतामुळे वनस्पतींची तुलनेने चांगली वाढ होते. स्वरांच्या मृदू कंपनांमुळे पेशींची रचना स्थिर राहते आणि सकारात्मक वाढ होते. रॉक किंवा मोठ्या आवाजातील तालवाद्यांचे संगीत वनस्पतींना ताण देऊ शकते. अशा कंपनांची तीव्रता जास्त असल्याने मुळांची वाढ मंदावणे, पानांची सुकणारी स्थिती किंवा नाजूक वनस्पतींची हानीही दिसून आली आहे.

दरम्यान, पाण्याचा आवाज, वारा हे ध्वनी वनस्पतींसाठी तुलनेने नैसर्गिक असतात आणि त्यांचा परिणाम सौम्य आणि संतुलित असतो, असे लक्षात आले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नादाचा, विशेषतः 'नादब्रह्म' या संकल्पनेचा महत्त्वपूर्ण विचार आहे. वेदांमध्ये, पुराणांमध्ये आणि आयुर्वेदात निसर्गाशी एकरूप होण्याचा उल्लेख आढळतो. अनेक शेतकरी आपल्या शेतात सकाळच्या वेळेस भजन किंवा शास्त्रीय संगीत लावतात. त्याचा वैज्ञानिक पुरावा मर्यादित असला तरी अनुभवजन्यदृष्ट्या त्यांना उत्पादनात सकारात्मक बदल आढळल्याचे अनेकदा ऐकायला मिळाले जाते. माणसांप्रमाणेच वनस्पतीही पर्यावरणाला प्रतिसाद देतात. आपण त्यांना सुखदायक संगीत ऐकवल्यास आश्चर्यकारक परिणाम मिळवू शकतो. त्यातून पानांची, फुलांची संख्या वाढते. फुलांची वेळ लवकर येते (किमान एक आठवडा). बिया लवकर फुटतात. हे थोतांड नसून त्यावर अनेक देशांमध्ये दीर्घ संशोधन (विकसितही) झाले आहे. या विषयावरील शोधनिबंध सर्वत्र उपलब्ध आहेत. वनस्पतींना शास्त्रीय संगीत, स्तोत्रे, बासरी, वैदिक चँट्स आवडतात पण कानठळ्या बसवणारे रॉक संगीत आवडत नाही, हे ही शोधनिबंधामध्ये नमूद केले आहे. ऐकायला मधुर वाटणाऱ्या शांत ध्वनीमुळे मनाची एकाग्रता आणि प्रसन्नता वाढते, मधुर संगीत श्रवणामुळे गायी जास्त दूध देतात. पक्षी, प्राणी यांची उत्पादनक्षमता वाढते. कुक्कुटपालन केंद्रांमध्ये अंड्यांचे उत्पादन वाढल्याचेही प्रयोगात आढळले आहे. मधुर ध्वनी-संगीतामुळे वनस्पती आणि पिकांची वाढ चांगली होते. डॉल्फीन या सागरी माशांना (बहामा बेटाजवळ) संगीत आवडते. गुरांना पाणी पाजताना शीळ घालतात. गुरांची तहान समाधानाने शांत होते.

वृक्षामध्ये प्राण असतो, त्यांना भावना असतात आणि ते मुके जीव नसून ध्वनीही निर्माण करतात, अशी ठाम धारणा असणारे अनेक निसर्गप्रेमी आहेत. त्यातले काही अनुभवी शास्त्रज्ञही आहेत. १९७० मध्ये पीटर टॉम्पकिन्स आणि क्रिस्टोफर बर्ड यांच्या 'द सीक्रेट लाइफ ऑफ प्लांट्स' या पुस्तकाने न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर यादीत स्थान मिळवले होते. या जोडगोळीने या विषयावर सुमारे पन्नास वर्षांपूर्वी सखोल अभ्यास केला होता. वनस्पती संगीताचा मानवाच्या आरोग्यावर होणारा विशेष प्रभाव पाहून अनेक डॉक्टर आनंदाने आश्चर्यचकित झाले. प्रभातफेरी वृक्षवल्लीच्या सहवासात केल्यास मन प्रसन्न होते, याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. शास्त्रज्ञांना आढळून आले की वनस्पती विद्युत आवेग आणि कंपने निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ, पान त्याच्या पृष्ठभागावर विद्युत प्रभार गोळा करू शकते आणि ते वनस्पतीच्या आतील उतींमधून प्रवाहित करु शकते. वनस्पतीच्या उती नंतर ते वनस्पतीच्या इतर भागांमध्ये प्रसारित करतात. तुम्ही रोपाच्या खोडाला प्लग जोडून त्याची शक्ती मोजू शकता. प्लॅन्टव्हेव हा उद्योग या क्षेत्रात भरीव कार्य करत आहे. त्याने अनेक उपकरणे विकसित केली आहेत, जी तुम्हाला वनस्पतींच्या संगीताचा आस्वाद देते. 'प्लँटवेव्ह' नावाचे उपकरण तुम्हाला निसर्गाशी अक्षरशः संपर्क साधू देते. ते तुम्हाला झाडे, फुले, बोन्सायपासून मशरूमपर्यंत वनस्पतींनी निर्माण केलेले आवाज ऐकू देतात. हे उपकरण पानांवर दोन इलेक्ट्रोड लावून वनस्पतींमधील विद्युतीय फरक ओळखू शकते. ही तफावत नंतर लाटांच्या रूपात रेखाटली जाते. तयार झालेले उत्पादन म्हणजे आनंददायी संगीताचा अखंड प्रवाह.

जीन थोबी या ख्यातनाम निसर्गप्रेमी संगीत अभ्यासकाने आपले अनुभव व्यावहारिक संगीत थेरपीमध्ये रूपांतरित करण्यास सुरुवात केली. त्याने युरोपमध्ये अनेक ठिकाणी वनस्पती संगीताच्या मैफिलीही आयोजित केल्या. समान वनस्पतीच्या टोनची पहिली मालिका नेहमी सारखीच असते. फक्त काही सेकंदांनंतर इतर टोन जोडले जातात. म्हणून प्रत्येक वनस्पती विशिष्ट ध्वनी कंपन निर्माण करतात. अनुभवाने आपण एखादी वनस्पती केवळ संगीताच्या नोट्सद्वारे ओळखू शकतो. वातावरणातील बदल, जसे की वारा, प्रकाश आणि मानवी स्पर्श यामुळे पीच, स्वर आणि लयीमध्ये फरक येऊ शकतो आणि काही झाडे इतरांपेक्षा मोठ्याने गातात. वनस्पती आणि संगीत यांचा परस्परसंबंध हा विज्ञान, संस्कृती आणि निसर्ग यांना जोडणारा विषय आहे. अजूनही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत, परंतु विद्यमान ज्ञानानुसार संगीत वनस्पतींच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करू शकते. संगीतामुळे वनस्पतींमध्ये होणारी प्रतिक्रिया ही जैविक पातळीवरील असली तरी तिचा प्रभाव मानवाला सौंदर्य, संतुलन आणि शांततेचा अनुभव देतो. संगीत केवळ मानवासाठी नाही, ते निसर्गासाठीही उपकारक ठरू शकते. म्हणूनच शेतात, बागेत किंवा घरातील रोपट्यांसाठी हलके, सुरेल संगीत वाजवणे हा निसर्गाशी संवाद साधण्याचा सुंदर मार्ग आहे.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

पान १ वरून

## ...आता २१ डिसेंबरला निवडणूकीचा निकाल

न्यायालयाने विचारलेल्या या प्रश्नामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे झाले होते. आयोगाच्या वकिलांनी मात्र यावर तात्काळ उत्तर न देता, काल दुपारी यासंदर्भातील निवेदन सादर करू असे सांगितले होते. त्यानुसार आता न्यायालयाने सर्वच ठिकाणचा निकाल आता २१ डिसेंबरलाच लागणार आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व तयारी पूर्ण केल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयाकडे सादर केले होते. मतदान असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये यंत्रणा केंद्रावर पोहोचली असून, कर्मचाऱ्यांनी आपली तयारी दाखवली आहे. त्यामुळे मतदान थांबवणे योग्य नाही, असे मत न्यायालयाने स्पष्ट केले होते. तथापि निकालाची तारीख पुढे ढकलल्यास जनतेच्या मनातील संभ्रम आणि राजकीय तणाव यावर अधिक परिणाम होऊ शकतो, असे निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवले होते. त्यानुसारच न्यायालयाने आजचा निर्णय दिला आहे. दरम्यान, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ८ ते १० वर्षांनंतर होत असल्याने मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. आज राज्यातील २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी मतदान होत आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी मतदानाची वेळ असून, यासाठी १२ हजार ३१६ मतदान केंद्रांवर ६२ हजार १०८ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. सुरक्षेसाठी पोलिस दलाचा मजबूत ताफा तैनात आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये मतदारांचा उत्साह पाहायला मिळत असून, कोणाचा झेंडा सर्वाधिक उंच जातो हे पाहण्यासाठी साऱ्या राज्याचे लक्ष मतपेटीकडे लागले आहे.

## महिला सक्षमीकरणात शालिनीताई विखेंचे योगदान

पाटील यांच्या बरोबरीने कार्य करताना अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अतिशय समर्थपणे सांभाळत शालिनीताई विखे पाटील यांनी आपल्या कार्याद्वारे आपली स्वतंत्र ओळख संपुर्ण राज्याला करून दिली. महिला बचत गट, प्रियदर्शिनी संस्था आणि इतर माध्यमातून त्यांनी महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करत शालिनीताईंच्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य सदस्य दिनेश बाबर यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात महिला सक्षमीकरणात शालिनीताईंचे नाव अग्रस्थानी असल्याचे म्हटले. याप्रसंगी पारनेर तालुका भाजपा उपाध्यक्ष अतुल माने, भाजपा मंडल कार्यकारिणी राहुल नरड, ग्रामपंचायत सदस्य प्रणल भालेराव, दीपक परंडवाल, प्रियांशु रोकडे, प्रेम भंडारी, प्रा. अर्जुन चाटे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. संदीप गेटम, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संजय जाधव, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुनिता भालेराव, छाया म्हस्के, नितीन घोलप, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, वैजनाथ आवारी, पांडुरंग शिरोळे आणि इतर मान्यवर, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विशाल रोकडे यांनी केले.

## नगरपरिषद, पंचायतींसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण

जात आहे. येथे बोगस मतदान झाल्याचा आरोप होत आहे. बुलढाणा नगरपालिकेच्या निवडणुकीत काल सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली. परंतु मतदानाला काही वेळही झाला नव्हता, तोच बोगस मतदानाचा प्रकार उघडकीस आल्याने खळबळ उडाली. प्रभाग क्रमांक १५ मधील गांधी प्राथमिक शाळा मतदान केंद्रावर एका व्यक्तीने वैभव देशमुख या मतदाराच्या नावावर मतदान करण्याचा प्रयत्न केला. मतदान झाल्यानंतर ही गफलत लक्षात येताच त्याला तात्काळ पकडले गेले. त्याच्यासोबत आणखी एक जण असल्याचीही माहिती समोर आली आहे. काँग्रेसने आरोप केला आहे की, इब्राहिमपूर आणि परिसरातून गाड्यांमधून बोगस मतदारांना आणण्यात आले. दोन वाहनांमध्ये भरून लोकांना मतदान केंद्रांवर पोहोचवले जात असल्याचा दावा काँग्रेसने केला असून, हा प्रकार लोकशाही प्रक्रियेवर मोठा आघात असल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कडक कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वर्धा येथील एका मतदान केंद्रावरील निवडणूक कर्मचारी गप्पा मारण्यात व्यस्त असल्यामुळे एक मतदार मतदान केल्यानंतर बोटाला शाई न लावताच मतदान केंद्राबाहेर पडल्याचे दिसून आले आहे. वर्ध्यातील केसरीमल कन्या शाळा, रूम नंबर १ मध्ये ही घटना घडली आहे. विजय उपशाम नामक मतदाराने आपले मत नोंदवले. मात्र, मतदानाची प्रक्रिया पूर्ण करताना मतदान केंद्रावरील संबंधित कर्मचारी दुगप्पांमध्ये इतके गुंग होते की, त्यांनी त्यांच्या बोटाला शाईच लावली नाही. त्यांनी या प्रकरणाची माहिती आपल्या ओळखीच्या लोकांना दिली. राज्यात दुबार मतदानावरून रान पेटले असताना हा प्रकार घडल्यामुळे मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हा प्रकार उजेडात आल्यानंतर तातडीने विजय उपशाम यांना पुन्हा मतदान केंद्रावर नेण्यात आले. तिथे त्यांच्या बोटाला शाई लावण्यात आली. मतदानासारख्या संवेदनशील प्रक्रियेत असा गलथानपणा केल्याबद्दल निवडणूक आयोगाच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सत्ताधोरी शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी मतदान करताना ते मोबाईल शूट केले. तसेच, महिला मतदारांना कुठे मतदान कराये हे ही सांगितले होते. निवडणूक आयोगाने त्यांच्या या कृतीची गंभीर दखल घेत त्यांच्या चौकशीचे आदेश दिलेत. या प्रकरणी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची बदली होण्याची शक्यता वर्तण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत असताना सकाळीच परिस्थिती बिघडली. नवे नगर परिसरात मतदान सुरू असताना अचानक गोगावले आणि सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. हा वाद काही क्षणांतच हिंसाचारात रूपांतरित झाला. दोन्ही गटांनी एकमेकांशी ढकलाढकली केली, ओरडाओरड झाली आणि लगेचच मारहाण सुरू झाली. सुशांत जाबरे आणि त्यांच्या अंगरक्षकाला गंभीर मारहाण करण्यात आली असल्याचे समोर येत आहे. त्या ठिकाणी उपस्थित सामान्य मतदार घाबरले आणि अनेकांनी मतदान केंद्राबाहेर पळ काढला. शांततेत मतदान होण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असताना अशा प्रकारचा हिंसाचार उफाळून आल्याने मतदारांचा आत्मविश्वास ढासळल्याचे स्पष्टपणे दिसले. महाराष्ट्रातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणूक अखेर आज पार पडत असताना मतदानाची सुरुवात होताच अनेक ठिकाणी मशीनने दगा दिल्याचे चित्र दिसून आले. पहाटेपासून मतदानासाठी उत्साहाने रांगा लावलेल्या मतदारांचा संयम तांत्रिक बिघाडामुळे सुटताना दिसला. अनेक केंद्रांवर मतदारांना प्रतिक्षा करावी लागत असून मतदान प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. काही यंत्रणा पूर्णपणे बंद पडल्यामुळे मतदान तात्पुरते थांबवावे लागले आहे. प्रशासनाकडून यंत्रणा दुरुस्त करण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू असले तरी या उशीरामुळे मतदारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. निवडणुका नीट पार पडाव्यात म्हणून मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आल्याचा दावा असतानाच मशीन बिघाडामुळे संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पान १ वरून

## भल्या पहाटे नगरमध्ये अग्नी-तांडव

बुरुडगल्लीतून बांबू गल्लीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कोपऱ्यालाच राहुल चंगेडीया, सचिन चंगेडीया, आनंद चंगेडीया, यांच्या मालकीची ३ मजली दगडी व सागवानी लाकडात बांधलेली इमारत आहे. ही सुमारे ९० वर्षांपूर्वी १९३७ साली बांधलेली इमारत असून या इमारतीत सध्या ए एस मार्केटिंग एजन्सी चे गोडावून होते. चंगेडीया यांच्या कडे चॉकलेट, ड्रायफ्रुट, औषधांची एजन्सी असल्याने त्यात सुमारे ६० ते ७० लाखांचा माल ठेवलेला होता. २ डिसेंबर रोजी सकाळी ६.३० ते ६.४५ च्या सुमारास या इमारतीतून धूर निघू लागल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने महापालिकेच्या अग्निशामक दलाला फोन करून माहिती दिली. तसेच इमारत मालकांनाही माहिती दिली.

इमारतीत लाकडाचा वापर जास्त असल्याने काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाला भडकत होत्या. सुरुवातीला बुरुडगल्ली मित्र मंडळाचे कार्यकर्ते व परिसरातील युवकांनी बादल्यांनी पाणी मारण्याचा प्रयत्न केला. इमारतीला लागलेली आग इतकी भीषण होती की, ती विझवण्यासाठी महापालिकेच्या ३ गाड्या, लष्कराच्या २ गाड्या व एमआयडीसी अग्निशामक दलाची १ अशा एकूण ६ गाड्यांनी शर्थीचे प्रयत्न केले.

मात्र लाकडी बांधकाम आणि इमारतीत असलेला चॉकलेट, ड्रायफ्रुट, औषधांचा मोठा साठा व त्यात प्लास्टिकचे आवरण असल्याने तळमजल्यापासून तिसऱ्या मजल्यापर्यंत आग मोठ्या प्रमाणात पसरलेली असल्याने संपूर्ण ३ मजली इमारत आणि त्यात असलेला सुमारे ६० ते ७० लाखांचा माल याचा सर्व कोळसा झाला.

गोडावून मध्ये सीसीटीव्ही यंत्रणा चालू असल्याने विजेचे शॉर्ट सर्किट होवून ही आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. या दुर्घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून इमारतीत किती माल होता. याची माहिती घेण्याचे काम सुरु असल्याचे सांगण्यात आले.

## बिबट्या जनसंख्या नियंत्रण प्रस्तावास मंजुरी द्या

छेदनाद्वारे कायमस्वरूपी जनन नियंत्रण, तसेच काही मादींवर औषधाधारित गर्भनिरोधकांची चाचणी अशा उपायांचे परीक्षण भारतीय वन्यजीव संस्था करणार आहे. ग्रामीण भागातील मजूर, महिला, मुले आणि जनावरांचे संरक्षण हा तातडीचा प्रश्न बनला असून केंद्राचा त्वरित हस्तक्षेप अपरिहार्य असल्याचे लंके यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेत 'आत्मा मालिक'चा दबदबा

## ३ सुवर्णांसह इतर ६ पदकांची कमाई; बजरंग शिरसाट सुवर्णपदक विजेता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : उत्तर महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद मान्यताप्राप्त १४ वी उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ नुकतीच नाशिक येथे दि. २२ व २३ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडली. यावेळी उत्तर महाराष्ट्र केसरी स्पर्धेत आत्मा मालिक दबदबा कायम ठेवला आहे.



अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नाशिक आणि नंदुरबार जिल्ह्यांतील कुस्तीगीरांनी सहभागी झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत आत्मा मालिक कुस्ती केंद्रातील मल्लांनी अद्वितीय कामगिरी करत एकूण ३ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य अशी ६ पदकांची चमकदार कमाई करून धमाकेदार यश मिळविले.

५० किलो वजनगटात त्याने अप्रतिम कुस्तीचे प्रदर्शन करत सुवर्णपदकावर नाव कोरले. त्याला आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच विवेक नायकल यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. बजरंग शिरसाट हा माजी बाजार समितीचे संचालक व माजी जिल्हा परिषद सदस्या उज्वला शिरसाट यांचा मुलगा असून त्याच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आत्मा मालिकच्या यशामध्ये आत्मा मालिक माऊलींचे कृपाशिर्वाद तसेच विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट कोकमठाणचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांचे प्रोत्साहन लाभले. आत्मा मालिक कुस्ती केंद्राचे संचालक एनआयसी राष्ट्रीय कुस्ती पंच गुरुवर्य भरत नायकल, आंतरराष्ट्रीय कोच विवेक नायकल, अशोक पाटील, अक्षय डांगे यांचेही मोलाचे मार्गदर्शन मल्लांना मिळाले.

# शेतकऱ्यांनी फिरवली कांदा पिकाकडे पाठ

## वाढता खर्च, कमी भावामुळे उदासीनता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : कांदा उत्पादनात आघाडीवर असलेल्या नगर तालुक्यातच यंदा कांदा लागवडीबाबत शेतकऱ्यांमध्ये उदासीनता दिसत आहे. वातावरणातील बदल, अतिवृष्टी, तसेच अवकाळीचे सावट, वाढलेला उत्पादन खर्च अन् गडगडलेले भाव, यामुळे कांद्याच्या आगारातच बहुतांश शेतकऱ्यांनी कांदा लागवडीकडे पाठ फिरविल्याचे चित्र तालुक्यात पाहावयास मिळत आहे. शेतकऱ्यांना नगदी उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून कांद्याकडे पाहिले जाते.



तालुक्यातील शेतकऱ्यांची मदार कांदा पिकावरच असते. शेतकऱ्यांचे वार्षिक गणितही कांदा पिकावरच आखले जात. गेल्या काही वर्षापासून शेतकऱ्यांसाठी कांदा पीक महत्त्वाचे ठरत होते. कांदा पिकावरच शेतकरी आपली सोनेरी स्वप्ने रंगवत असे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून कांद्याने अक्षरशः शेतकऱ्यांना रडवले आहे. गावरान कांदा, लाल कांदा, रांगडा कांदा लागवडीत नगर तालुका नेहमीच अग्रेसर राहिला आहे. कांद्याच्या विक्रमी उत्पादनामुळे अनेक राज्य, तसेच परराज्यातील व्यापारी तालुक्यात स्थायिक होऊन कांद्याचा व्यापार करीत आहेत.

संपूर्ण जिल्ह्यात शेतकऱ्यांकडून कांद्याची बांधावरील खरेदी नगर तालुक्यातच होत असते. तालुक्यातील कांदा हा राज्यासह परराज्यात निर्यात होतो. गुणवत्ता व दर्जा चांगला असल्याने येथील कांद्याला मोठी मागणी असते. बंगळुरू, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, तसेच इतर ठिकाणी बाजारपेठ मिळते. सध्या बाजारात कांद्याचे भाव गडगडले असून, या दरात कांदा विकणे शेतकऱ्यांना परवडणारे नाही. आतापर्यंत शेतकऱ्यांनी गावरान कांदा वखारीमध्ये साठवून ठेवला होता.

बाजार मिळेल, या आशेवर शेतकऱ्यांनी ठेवलेला कांदा खराब होण्यास सुरुवात झाली आहे. परंतु, बाजारभाव काही वाढलेच नाही. त्यात लाल कांदाही बाजारात येण्यास सुरुवात झाली. त्यामुळे कांद्याचे भाव वाढण्याची आशा धुसर झाली आहे. आजच्या बाजारभावात कांदा विकला, तर झालेला खर्चही वसूल होत नाही, हे वास्तव आहे.

### गहू, ज्वारी पिकाला आता पसंदी

कांदा पिकाची झालेली विदारक परिस्थिती पाहता, तालुक्यातील शेतकऱ्यांनी कांदा लागवडीकडे पाठ फिरविल्याचे चित्र दिसून येत आहे. कांदा पिकाऐवजी शेतकऱ्यांनी यंदा आपला मोर्चा गहू, ज्वारी, हरभरा व इतर चारा पिकांकडे वळविला आहे. त्यामुळे कांदा उत्पादनात तालुक्यात मोठी घट होणार असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

# कुंभेफळ येथे गीता जयंती उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : प्रत्येक माणसाने जन्म घेतल्यानंतर आपलेजीवन कशा पद्धतीने जगावे याचे ज्ञान भगवद्गीतेमध्ये भगवंताने अर्जुनाला दिले आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्याचे अनुकरण करावे, असे प्रतिपादन कर्जत तालुक्यातील गीता अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल उर्फ भाऊ पाटील यांनी केले.

त्यांच्या पुढाकारातून कर्जत तालुक्यातील कुंभेफळ गावात गीता जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात भगवद्गीतेच्या मिरवणुकीने झाली. हातात गीता, भगवा पताका आणि प्रेरणादायी फलक घेऊन ग्रामस्थ, महिला मंडळे, विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक आणि युवक मिरवणुकीत सहभागी झाले.

गीता वाचू- जीवन घडवू, कर्म कर – फळाची चिंता नको अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गावभर अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

यानंतर गीतेची विधिवत पूजा आणि श्लोक पठणाचा कार्यक्रम पार पडला. पाटील यांनी श्रीकृष्णाने सांगितलेल्या गीतेच्या उपदेशाचे आधुनिक जीवनातील महत्त्व उलगडून सांगितले. मानवाने कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग यांचा संतुलित अवलंब केल्यास जीवनातील संकटे सहज पार करता येतात, असा संदेश यावेळी देण्यात आला.

निष्ठा, सत्यनिष्ठा आणि कर्तव्यपरायणता ही गीतेची मूलतत्त्वे प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारावीत, असे प्रतिपादन करण्यात आले.

# तडीपारीचा आदेश झुगारणाऱ्यांना अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यासह नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, येवला, निफाड आणि छत्रपती संभाजीनगर वैजापूर तालुक्यातून तडीपार केलेले असतानाही कोपरगाव शहरात फिरणाऱ्या दोघांना शहर पोलिसांनी अटक केली. एकाजवळून धारदार कत्ती पोलिसांनी जप्त केली. चेतन सुनील शिरसाठ (रा. निवारा, कोपरगाव) व तनवीर मोहंमद हानिफ रंगरेज (रा. सुभाषनगर, कोपरगाव) अशी अटक केलेल्या सराईत गुन्हेगारांची नावे आहेत.




शिर्डी येथील उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी चेतन शिरसाठ व तनवीर रंगरेज यांना संपूर्ण अहिल्यानगर – जिल्हा व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, निफाड, येवला आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर हद्दीतून तडीपार केले होते. तडीपारीचे आदेश झुगारून हे दोघे शहरात फिरत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांना मिळाली होती. तडीपारीचे आदेश झुगारून दोघेजण शहरात फिरत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांना मिळाली होती. कुंभार यांनी पोलिस पथकास त्यांचा शोध घेण्याच्या सूचना केल्या होत्या. तेव्हा रविवार दि. ३० नोव्हेंबर रोजी चेतन शिरसाठ शहरातील निवारा परिसरात कत्तीसह सापडला. त्यास अटक करून न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्यांची रवानगी कारागृहात केली आहे. तनवीर रंगरेज हा सुभाषनगर परिसरातील कमानीजवळ आढळून आला. पोलिस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर भांगरे व पोलिस कॉन्स्टेबल गणेश काकडे तक्रारीवरून यांच्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पूर्वीच्या गुन्ह्यात दोघांना वर्ग करण्यात आले आहे.

# शेतीसाठी दिवसा वीज देण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्यांचा मुक्तसंचार वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच सध्या रब्बी हंगाम सुरु झाल्याने गहु, कांदा या पिकांना पाणी देणे गरजेचे आहे, त्यामुळे महावितरणने शेतीसाठी दिवसा वीज द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी महावितरणकडे केली आहे.



श्रीरामपूर तालुक्यातील प्रत्येक गावाच्या लोकेशनला बिबट्याचा वावर आहे, प्रवरा पट्ट्यामध्ये नदीला पाणी असल्याने आणि ऊसाचे क्षेत्र वाढल्याने बिबट्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक भागात बिबट्यांचा धुमाकूळ सुरु आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

अलीकडील काही गंभीर घटनांमुळे या भीतीचे रूपांतर आता दहशतीत झाले आहे. अनेक भागांत बिबट्या राहत्या घरांपर्यंत पोहोचल्याने नागरिकांमध्ये तीव्र दहशत व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम वाया गेला आहे. त्यांच्या सर्व आशा रब्बी हंगामावर असल्याने शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून रात्री शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागत आहे.

गेल्या काही दिवसांत बिबट्यांचा वावर वाढला असल्याने रात्रीच्या वेळी शेतात जाणे शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने शेतीसाठी रात्रीऐवजी दिवसा वीज पुरवठा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# पाथरवाला गावात कृषिदूतांचे स्वागत




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न असलेल्या सोनई येथील मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषि जागरुकता कार्यानुभव व कृषि औद्योगिक संलग्नक अंतर्गत पाथरवाला गावात दाखल झाले. त्यांचे ग्रामपंचायतीच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कृषिदूत अमित वाघ, उदयनराजे उगले, प्रज्वल सोनवणे, ओंकार वाबळे, पार्थ सावंत, गौरव तोडमल यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती, तसेच गावात प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, नैसर्गिक साधन संपत्ती, समाजातील सामाजिक स्थिती, पीक पद्धती या विविध गोष्टीचा अभ्यास करणार आहेत. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनिल बोरुडे, डॉ. अतुल दरंदले, डॉ. एस. बी. चौगुले व इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.याप्रसंगी गावाचे ग्रामविकास अधिकारी बी. डी. घनवट, कृषिसेवक आदिनाथ वाबळे, प्रगतशील शेतकरी बाळासाहेब खाटीक, आदिनाथ थोरे, अमोल खाटीक व गावकऱ्यांनी कृषिदूतांचे स्वागत केले. यावेळी कृषीदुतांनी आभार मानले.

### कृषिदूत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार

शेतकऱ्यांनाही विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व किडी याची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण,बीज प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

# उद्यापासून म्हसोबा महाराजांचा यात्रोत्सव

## कुस्त्यांचा हगामा, बैलगाडा शर्यत आणि लोकनाट्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुकचे ग्रामदैवत म्हसोबा महाराज यात्रा गुरुवार ४ डिसेंबरपासून आरंभ होत आहे. यात्रेनिमित्त ग्रामस्थ व यात्रा कमिटीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

महाराष्ट्रासह अनेक राज्यातील हजारो भक्त असलेल्या म्हसोबा महाराज यात्रेला दत्त जयंतीला आरंभहोणार आहे. ४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व सौ. शालिनीताई यांच्या हस्ते मूर्ती अभिषेक होईल. दुपारी ४ वाजता काठीची सवाद्य मिरवणूक निघेल. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येईल. रात्री ९ वाजता अश्विनी शिवानी बोरगावकर यांचा मोफत लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार ५ रोजी



संगमनेर रस्त्यावरील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील क्रीडा संकुल, रंगारी मैदान येथे दुपारी २ वाजता जंगी कुस्त्यांची दंगल होईल.

रात्री ९ वाजता मोफत सविताराणी पुणेकर लोकनाट्य तमाशाचे आयोजन केले आहे. शनिवार ६ रोजी दुपारी १ वाजता लोणी तळेगाव रस्त्यावरील सैनिकी स्कूलजवळ भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून स्पर्धक यात सहभागी होणार आहेत. यात्रा कमिटी व ग्रामस्थांनीजलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेचे नियोजन केले आहे.

# अयप्पा मंदिरात शिव आराधना प्रवचन संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वाळकी** : नगर अयप्पा मंदिरात ६० दिवसीय मंडल– मकरविलक्कु वार्षिक उत्सवास सुरवात झाली आहे. त्यानिमित्त रोज धार्मिक कार्यक्रम होत असून यामध्ये ३ दिवसीय दिव्य ज्योती जागृती संस्थान द्वारे भगवान शिव आराधना या प्रवचनाचे ३ दिवसीय आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अमोघनंद महाराज यांनी आपल्या मधुर वाणीतून शिव कथा सांगून भाविकांचे प्रबोधन केले आहे. ३ दिवसात महाराज म्हणाले की, दिव्य ज्योति जाग्रति संस्थान एक सामाजिक व आध्यात्मिक संस्था आहे त्याचे संस्थापक आशुतोष महाराज आहेत. संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगिन विकासासाठी सामाजिक व आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

याच श्रृंखले अंतर्गत अय्यप्पा मंदिरामध्ये अय्यप्पा सेवा समितीच्या वतीने शिव आराधन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात शाश्वत धर्मग्रंथ व भजनांच्याआधारे खालील सर्व प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला. भगवान शिवजी कोणत्या भक्तीने प्रसन्न होतात, भगवान शिवजीचे दिव्य स्वरूप समाजाला कोणती शिकवण देत आहे , ग्रंथानुसार शिवतत्त्व प्राप्त करून देणारा भक्तीचा शाश्वत मार्ग कोणता , वर्तमानकाळात शिवतत्त्वाचे दर्शन संभव आहे का , भगवान शिवजींनी गुरूगीतेमध्ये खऱ्या सद्गुरूची ओळख सांगितली आहे. ती कोणती ,ग्रंथानुसार ध्यानाची शाश्वत पध्दत कोणती या व अशा सारख्या अनेक प्रश्नांची समाधान कारक उत्तरे दिली.

# ज्ञानेश्वर महाविद्यालयात एड्स दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : मुळा एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासे फाटा येथे राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व ग्रामीण रुग्णालय, नेवासा फाटा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण घनवट होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ आगळे यांनी केले.

त्यांनी एड्समुक्ती कार्यक्रमाचे महत्त्व विशद करून प्रतिबंध, जनजागृती व उपचार यांविषयी माहिती दिली. ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक श्री. अविनाश गायकवाड यांनी महाराष्ट्र राज्य एड्स जागृती व उपचारामध्ये देशात अग्रेसर असल्याचे सांगितले. तसेच विहान एन.जी.ओ. संस्थेच्या श्रीमती संगीता गर्जे यांनी एड्स रुग्णांसाठी काम करतानाचा आपला स्वानुभव सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. राजेंद्र दारकुंडे, डॉ. संजय घनवट, डॉ. एन. डी. शेख, कॅप्टन सुभाष आगळे, डॉ. दिनकर आवारे, डॉ. सुरेश काळे, डॉ. उमेश कांबळे, डॉ. राजेश वाघ, डॉ. जगताप, प्रा. नितीन भोगे, प्रा. रेणुका सरगय्ये, प्रा. किरण वैद्य, श्री. रवींद्र चव्हाण, डॉ. पावसे, प्रा. विशाल परदेशी उपस्थित होते.

# एड्सविषयी गैरसमज दूर करणे गरजेचे

## समुपदेशक कांबळे : पाथर्डीत जनजागृती रॅली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : एड्स हा आजार लपवण्याचा नव्हे, तर योग्य माहिती मिळवून जागरूक राहण्याचा आहे. उपचार, प्रतिबंध आणि सुरक्षिततेच्या समाजात जितकी जास्त माहिती उपायांबाबत पोहोचेल, तितका हा आजार नियंत्रणात ठेवणे शक्य होते, असे प्रतिपादन पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक संदीप कांबळे यांनी केले.

जागतिक दिनानिमित्त (१ एड्स डिसेंबर) सोमवारी पाथर्डी शहरातील आनंद कॉलेज ऑफ फार्मसी आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी प्राचार्य विलास भगत, प्रयोगशाळा तंत्रज्ञ रविंद्र भोईटे, प्रा. प्रतिभा गरुड, प्रा. सुनिल महाजन, संजय पटारे,



शिवनाथ जरांगे, राजेंद्र कासार, प्रमोद रोडी आदी उपस्थित होते. महाविद्यालयातून निघालेल्या रॅलीत विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. हातातील फलक आणि घोषणांमधून एड्सबाबत जाणून घ्या, भीऊ नका.

सुरक्षित वर्तन, निरोगी जीवन, गैरसमज नाही, जागरूकता हवी अशा संदेशांनी नागरिकांना आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांची पायी रॅली अहिल्यानगर रोड, माणिकदौंडी चौक, संस्कार भवन चौक, जुने बसस्थानक परिसर या भागातून मार्गक्रमण करत नागरिकांशी संवाद साधून एड्सविषयी जागृती करण्यात आली. रॅलीचा समारोप विद्यालयात विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देऊन एड्सविषयी जागृती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी नियमितपणे एड्सविषयी इतरांना ही माहिती द्यावी, असे वैद्यकीय प्रतिनिधींनी सांगितले.

### एड्सबद्दल चुकीच्या समजुती

कांबळे म्हणाले, एड्सबद्दल अनेकांना चुकीच्या समजुती आहेत. हा आजार स्पर्शान, हस्तांदोलनाने किंवा एकत्र जेवणाने पसरत नाही. अनावश्यक भीती बाळगण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाय आणि वैज्ञानिक माहिती आत्मसात करणे गरजेचे आहे. एड्सची चाचणी, समुपदेशन आणि उपचार या सुविधांसाठी आरोग्य विभाग सातत्याने कार्यरत आहे. समाजातील भीती आणि गैरसमज दूर करण्यासाठी अशा रॅली अत्यंत परिणामकारक ठरतात.

# वळण शाळेत प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

## आनंददायी शनिवार ठरणार विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वळण** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वळण येथे आनंददायी शनिवार उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून दर शनिवारी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवर्धनासोबतच स्पर्धात्मक वृत्ती आणि गटभावना विकसित करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना आठवडाभर अभ्यास करण्यासाठी विशेष विषय आधीच जाहीर केला जातो. त्यानंतर शुक्रवारी प्रत्येकी २५ गुणांची चाचणी घेऊन चौथी ते सातवी या इयत्तांमधून सर्वाधिक गुण मिळवणारे ४ विद्यार्थी निवडले जातात. चारही इयत्तांतील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड करून मिश्रित स्वरूपाची चार गट तयार केली जातात. प्रत्येक गटात चौथी, पाचवी, सहावी आणि सातवीचे प्रत्येकी एक विद्यार्थी समाविष्ट असतो.



शनिवारी सकाळी सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गटांमध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येते. विविध फेऱ्यांमधील प्रश्नांना योग्य उत्तरे देत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विजेत्या गटाचा मान मिळतो.

विजेत्या गटातील विद्यार्थ्यांना शाळेच्यावतीने प्रोत्साहनपर गटाला बक्षिसे देऊन सन्मानित केले जाते.

### विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणार

शाळेतील शिक्षकांनी सामूहिकरित्या या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड वाढत असून आत्मविश्वास, वक्तृत्व, सहकार भावना आणि स्पर्धात्मकता यांसारख्या गुणांचा विकास होत आहे. आनंददायी शनिवार उपक्रमामुळे शालेय वातावरणात उत्साह निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होणार आहे.

# संगमनेरमध्ये सेवा समितीचाच विजय होणार

## माजी मंत्री थोरात; आ. सत्यजित तांबे व डॉ. मैथिली तांबे यांनी बजावला मतदानाचा हक्क



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** लोकशाही प्रक्रिया ही निकोप असावी. निवडणूक आयोगाने मतदानासाठी निर्दोष कार्यक्रम जाहीर केला पाहिजे. मात्र असे होत नाही. हे अत्यंत दुर्दैवी आहे. निवडणूक आयोगाचा कार्यक्रम हा मंत्रालयातील कुणीतरी पीए ठरवत असून त्याची अंमलबजावणी आयोग करत आहे. निवडणूक आयोग हा पूर्णपणे सत्तेचा गुलाम झाल्याची माहिती माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

> लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली आम्ही कायम विकासाचे कामे केली आहेत. विकासासाठी सातत्याने निधी आणला आहे. संगमनेर तालुका व शहर हा एक परिवार असून जनतेचा आमच्यावर विश्वास आहे. सेवा समितीचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील.
>
> **– सत्यजित तांबे, आमदार**

### संगमनेर शहरात मोठा उत्साह

नगरपरिषदेची निवडणूक नऊ वर्षानंतर होत असून संगमनेर शहर व उपनगरांमधील नागरिकांमध्ये मतदानाबाबत मोठा उत्साह दिसून आला. सकाळी सकाळी नागरिकांनी प्रत्येक मतदान केंद्रावर रांगा लावल्या असून नागरिकांचा मोठा उत्साह हा या निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरले आहे.

संगमनेरमध्ये माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते.माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राज्यघटना आणि देश टिकवण्यासाठी लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे आणि या मतदार प्रक्रियेमध्ये निर्दोष कार्यक्रम जाहीर होत नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे. दोन दिवसांवर निवडणूक प्रक्रिया येते आणि त्यानंतर स्थगित केले जाते. हा प्रकार कधीच घडला नाही. असं आता घडत आहे हा काय गोंधळ चालला आहे. असा सवाल करताना मंत्रालयातील कोणीतरी पीए निवडणूक कार्यक्रम असतो आणि निवडणूक आयोग तो जाहीर करतो असे आमचे स्पष्ट मत आहे. कारण निवडणूक आयोगातील अधिकारी उच्च पदस्थ असतात. त्यांना निवडणुकीचा अनेक वेळा अनुभव असतो. परंतु ते सत्तेच्या दबावाखाली काम करत आहे.

मतदार याद्यांमध्ये गोंधळ आहे. याबाबत आम्ही अनेक वेळा दाद मागितली. यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत आहे. मतदार याद्या दोष दुरुस्त करावा अशी आमची मागणी असताना साधा तहसीलदार उत्तर देतो तो दूर होऊ शकत नाही. मतदार यादी गोंधळ आणि ईव्हीएम बाबत ते काहीही करू शकतात हे सर्व देशाने पाहिले आहे. त्यामुळे आज मतदान झाल्यानंतर उद्याच मतमोजणी झाली पाहिजे ही आमची मागणी आहे. कारण वीस दिवस ईव्हीएम पेट्यांचे काय होईल याबाबत सर्व देशातील जनतेला शंका आहे. कारण सत्ताधाऱ्यांची वागणे असे आहे की शंका येणे साहजिक असल्याचे ते म्हणाले.

तर डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, विरोधकांचे काम आरोप करणे असा आहे. तर आमचे काम काम करत राहणे आहे. काम केले आहे कमाल करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, डॉ. हर्षल तांबे, डॉ. वर्षा तांबे यांनी मतदानाचा हक्क बजावला

---

# हनुमंतगावात गुरुचरित्र पारायणासह कीर्तन महोत्सव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव :** राहाता तालुक्यातील हनुमंतगाव माढरे वस्ती येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण, किर्तन सेवा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडणार आहे.

या चार दिवसीय धार्मिक उत्सवाची सुरुवात मंगळवारपासून होणार असून दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत अध्यात्मिक ज्ञान आणि भाविकांच्या भक्तीला उजाळा देणारी कीर्तनांची मैफल सजणार आहे. यात नवनाथ महाराज माळवदे, गोरक्षनाथ महाराज अनर्थे, तसेच बाबासाहेब महाराज वाणी आपले कीर्तन प्रवचनाद्वारे दत्तभक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन करणार आहेत.

यातील विशेष आकर्षण म्हणजे दि. ४ डिसेंबर रोजी होणारा दत्तजन्मोत्सव सोहळा, ज्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे. दत्तजयंतीच्या दिवशी विविध धार्मिक विधी, भजन, गुरुचरित्र पठण आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी होणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. काल्याच्या कीर्तनाचा भाविकांना अध्यात्मिक अनुभव मिळतो. कीर्तनानंतर समस्त ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भक्तांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# नेवासा निवडणुकीचा गोंधळ थेट हायकोर्टात?

## ‘आप’ची याचिका दाखल करण्याची तयारी; २० डिसेंबरच्या मतदानावर परिणाम करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** राज्य निवडणूक आयोगाने दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी अचानक सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करून नेवासा नगरपंचायतसह राज्यातील निवडणुकांना स्थगिती दिल्यानंतर, आम आदमी पार्टी आयोगाच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी थेट उच्च न्यायालयात धाव घेणार आहे.

### निवडणूक न्यायालयीन कचाट्यात अडकणार?

आयोगाच्या आदेशात निवडणुकीचे टप्पे पुन्हा सुरू करण्यासंबंधी असलेल्या कायदेशीर त्रुटींवरही आपने बोट ठेवले आहे. छाननी प्रक्रिया पुन्हा न घेतल्यास, सदर निवडणूक प्रक्रिया पुन्हा एकदा न्यायालयीन कचाट्यात अडकण्याची शक्यता आहे, असा स्पष्ट इशाराही आपने दिला आहे.

आपने आयोगाच्या निर्णयावर गंभीर आक्षेप घेतला आहे. त्यांचा मुख्य मुद्दा असा आहे की, ३ डिसेंबर रोजी जाहीर होणारे इतर नगरपंचायतींचे निकाल २० डिसेंबरच्या मतदानावर थेट परिणाम करतील, ज्यामुळे आचारसंहितेचा भंग होईल.आयोगाच्या आदेशानुसार, काही ठिकाणचे मतदान २ डिसेंबरला होऊन त्याचा निकाल ३ डिसेंबरला लागणार आहे, तर नेवासासह इतर ठिकाणचे



मतदान २० डिसेंबरला होणार आहे.

आपच्या म्हणण्यानुसार, आधी जाहीर झालेल्या निकालांचा थेट परिणाम पुढील मतदानावर होणार असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे की, २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकांची मतमोजणी आणि निकाल जाहीर करण्याची तारीख पुढे ढकलून, ती सुधारित कार्यक्रमानुसार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजीच एकत्रितपणे घोषित करण्यात यावी.

या गंभीर प्रश्नावर कायदेशीर लढाई लढण्यासाठी आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष ॲड. सादिकभाई शिलेदार, युवा नेते ॲड. संजय सुखदान, शहर अध्यक्ष संदीप आलंवणे, विठ्ठलभाऊ मैंदाड, सलीम भाई शेख, करीमभाई सय्यद आणि मुन्ना आतार हे यावेळी उपस्थित होते.

---

# मानव-बिबट्या संघर्ष निवारण कार्यशाळा

## सुपा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात वन विभागाचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** रयत शिक्षण संस्थेच्या सुपा येथील न्यू इंग्लिश स्कूल महाविदयालयात वन विभाग यांच्यावतीने मानव-बिबट संघर्ष निवारण कार्यक्रम या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा उपवनसंरक्षक विठ्ठल यांच्या अध्यक्षतेखाली व पारनेरचे वनपरिक्षेत्र अधिकारी जी. व्ही. धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा व विद्यालयांमध्ये बिबट जागृती व त्यापासून रक्षण करावयाचा उपयोग योजना, या करिता वाइल्डलँड्स कन्झर्वेशन फाउंडेशनचे संचालक अजिंक्य भांबुरकर यांची नियुक्त करण्यात आलेली आहे.

भांबुरकर म्हणाले की, बिबट्या हा हिंस्र प्राणी ज्या क्षेत्रात वास्तव्य करतो. त्या

> पारनेर तालुक्यातील नागरिकांनी व मुलांनी स्वतःची काळजी घ्यावी. पालकांनी मुलांकडे लक्ष द्यावे. संध्याकाळी पाच नंतर व सकाळी सातपर्यंत बिबट जास्त सक्रिय असतो. शेतात काम करणाऱ्या लोकांनी काळजी घ्यावी, सावधगिरी बाळगावी.
>
> **– वनरक्षक पठाण**



परिसरात माणसांनी एकट्याने वावर न करता दोन किंवा अधिक लोकांनी सोबत राहावे, मोठ्याने बोलत जावे, म्हणजे बिबट्याला तुमची चाहूल कळेल. अचानक बिबट्या जवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा, बिबट्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्या, त्याला डिवचण्याचा प्रयत्न करू नका, तात्काळ वन विभागाला कळवा.

रात्री फिरताना जवळ बॅटरी व काठी बाळगा. संध्याकाळच्या वेळेस घराच्या अंगणात किंवा परिसरामध्ये लहान लहान मुलांना एकटे सोडू नका, घडलेल्या घटनांमध्ये लहान मुले,महिला यांच्या बाबत रात्रीचे वेळेस हल्ल्याच्या घटना घडलेल्या आहेत. याबाबत विशेष खरबदारी घ्यावी.

या कार्यशाळेस प्राचार्य जाधव, वनपाल शेख, पठारे, रवी बांदल, राजकुमार इकडे, रोहित मेमाणे आदी मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# प्रत्येकाने जीवनात गीतेचे अनुकरण करावे : पाटील



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** प्रत्येक माणसाने जन्म घेतल्यानंतर आपली जीवन कशा पद्धतीने जगावे, याचे ज्ञान भगवद्गीतेमध्ये भगवंताने अर्जुनाला दिले आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्याचे अनुकरण करावे, असे प्रतिपादन कर्जत तालुक्यातील गीता अभ्यासक सामाजिक कार्यकर्ते अनिल पाटील यांनी केले.

कर्जत तालुक्यातील कुंभेफळ गावात गीता जयंती मोठ्या भक्तिभावात आणि सांस्कृतिक उत्साहात साजरी करण्यात आली. सनातन संस्कृतीतील ज्ञानाचे अनमोल दालन मानल्या जाणाऱ्या भगवद्गीतेचा दिव्य संदेश गावागावांत पोहोचवण्यासाठी अनिल पाटील यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. गीतेचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य सातत्याने करणाऱ्या पाटील यांच्या संकल्पनेमुळे या वर्षीचा उत्सव अधिक भव्य आणि उत्साहपूर्ण ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात गावातून काढण्यात आलेल्या भगवद्गीतेच्या मिरवणुकीने झाली. हातात गीता, भगवा पताका आणि प्रेरणादायी फलक घेऊन ग्रामस्थ, महिला मंडळे, विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. गीता वाचूजीवन घडवू, कर्म करफळाची चिंता नको, अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गावभर अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.यानंतर गीतेची विधिवत पूजा आणि श्लोक पठणाचा कार्यक्रम पार पडला.

---

# विद्यार्थिनींनी पथनाट्यातून केला संविधानाचा जागर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर महाविद्यालयात संविधान दिन अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी जागरूकता संविधान की या प्रभावी पथनाट्यातून संविधानाचा जागर केला.

विद्यार्थिनींनी संविधान प्रस्तावना, राष्ट्रीय एकात्मता, समता, बंधुता, स्वतंत्रता, न्याय व लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचे महत्त्व उपस्थितांना अत्यंत प्रभावीपणे समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर व उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. शामराव घनघाव, एनसीसी विभाग प्रमुख प्रा. भरत डगळे,सर्व शिक्षक व ११ वी, १२ वीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापिका सीता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ११ वीच्या विद्यार्थिनींनी जागरूकता संविधान की हे संविधान मूल्यांवर प्रकाश टाकणारे पथनाट्य सादर केले. या पथनाट्याने आणि उद्देशिकेच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

वैष्णवी दुस्मान, भाग्यश्री निमोणकर, विद्या बोरुडे, अनुष्का श्रीमंदिलकर, श्रावणी औटी, सलोनी पंडित, मुग्धा दळवी, संपदा तामखडे, तमन्ना इनामदार आणि निकिता चत्तर यांनी अभिनयातून संविधान मूल्यांची जनजागृती केली.

---

# हरीचे नाव जपणारा भक्त पुण्यवान बनतो

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** बाह्य पूजा नसेल तरी चालेल नाम हेच खरे मंदिर घडवते. हरीचे नाव जपणारा भक्त सात्त्विक, निर्लेप आणि पुण्यवान बनतो, असे प्रतिपादन डॉ. ह.भ.प. रामकृष्णदासजी महाराज लहवितकर यांनी केले.

अमृतवाहिनी प्रवरेच्या कुशीत वसलेल्या, संत महिपती महाराज व संत मुकुंददास महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र दाढ खुर्द येथे सुरू असलेल्या ब्रम्हलीन सद्गुरू माणिकगिरी महाराज, बिरोबा महाराज अखंड हरीनाम सप्ताहामध्ये ते सेवा देताना बोलत होते.

### दाढ खुर्द सप्ताहातील प्रेरणादायी घटना

रात्री प्रसाद घेताना पिंप्री लौकी-अजमपूर येथील कलाबाई ज्ञानदेव भागवत यांना दिड तोळे सोन्याचे डोरलं व मणी सापडले. प्रामाणिकपणे त्यांनी तत्काळ ते दाढ खुर्द सप्ताह समितीकडे जमा केले. सोनं खळी कांगणवाडी येथील ताराबाई घुगे यांचे असल्याचे स्पष्ट होताच, सप्ताह समितीने ते महंत दत्तगिरीजी महाराजांच्या हस्ते परत सुपूर्द केले.

डॉ. ह.भ.प. रामकृष्णदासजी महाराज लहवितकर यांची कीर्तन सेवा भव्य भक्तीरसात रंगली. ‘हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय’ या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ओवीचे चिंतन मांडत त्यांनी सांगितले की, नामस्मरण हेच श्रेष्ठ साधन हरीनाम सतत जपणाऱ्या भक्तांचे मन, वाणी आणि कर्म पवित्र होते. बाह्य पूजा नसेल तरी चालेल नाम हेच खरे मंदिर घडवते. हरीचे नाव जपणारा भक्त सात्त्विक, निर्लेप आणि पुण्यवान बनतो.

## डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर दाढ खुर्द सप्ताहात भक्तांचा महासागर



त्यांच्या रसाळ आणि प्रभावी वाणीतून संपूर्ण परिसर भक्तिभावाने न्हाऊन निघाला. सप्ताहाच्या सहाव्या दिवशी हजारो भाविकांनी दाढ खुर्द येथे मोठी गर्दी केली.

कीर्तनानंतर पंचक्रोशीतील गावांच्या सहकार्याने दाढ खुर्दवासीयांनी आमटी, भाकरीचा भव्य महाप्रसाद आयोजित केला होता. संपूर्ण सप्ताह महंत दत्तगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व दिव्य पद्धतीने पार पडत आहे. ताराबाई घुगेंनी कृतज्ञतेने सप्ताहासाठी ११११ रुपये दान अर्पण केले.

---

# चंदगीरवाडीमध्ये बिबट्याने केल्या कोंबड्या फस्त

## जनावरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न; पिंजरा लावण्याची मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तालुक्यात बिबट्यांचे प्रमाण वाढले असून तालुक्यासह ग्रामीण भागात बिबट्यांचा मुक्त संचार वाढला आहे. तालुक्यातील एकदरे चंदगीरवाडी येथे पहाटे तीनच्या सुमारास संतू रामा भांगरे यांच्या रहात्या घराचा बिबट्याने दरवाज्या तोडून घरामध्ये प्रवेश केला व गोठ्यात असणाऱ्या कोंबड्या फस्त करत त्याने शेळ्या व जनावरे यांच्यावरही हल्ला केला. जनावरे किरकोळ जखमी झाले आहेत.

साधारणता एक तास हा बिबट्या घरातच होता. यामध्ये या शेतकऱ्याचे पशुपालनचे हजारो रूपयांचे नुकसान झाले आहे.

संतू रामा भांगरे यांच्या कुटुंबामध्ये लहान मुले असल्याने चांगलेच भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत. सदर कुटूंब हे झापस्तीवर राहत असून रात्रीच्या सुमारास बिबट्या येऊन जनावरावर हल्ला करतो

रात्रीची वेळ आल्यामुळे व लाईट नसल्यामुळे आम्हाला काहीच करता आले नाही. वन विभागाने येऊन आम्हाला न्याय दिला पाहिजे. आमचे कुटुबात लहान मुले आहेत, अशी माहिती संतू भागरे यांनी दिली एकदरे परिसरात बिबट्यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

---

# संगमनेरच्या विकासात मालपाणी समूहाचे योगदान

## आमदार सत्यजित तांबे; मालपाणी उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांशी संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा परिवार आहे. आणि या परिवारात मालपाणी परिवार हा घटक अत्यंत महत्त्वाचा असून मालपाणी परिवाराचे संगमनेरच्या विकासात मोठे योगदान असल्याचे गौरव उद्गार आमदार सत्यजित तांबे यांनी काढले आहे.

मालपाणी उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांची संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी समवेत उद्योगपती राजेश मालपाणी, मनीष मालपाणी, गिरीश मालपाणी डॉ. मैथिलीताई तांबे आदी उपस्थित होते.

आ. सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर शहर व तालुका हा आपला परिवार आहे या परिवाराच्या विकासात मालपाणी परिवार हा कायम लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. स्वर्गीय ओंकार मालपाणी, माधव मालपाणी यांच्यापासून सुरू झालेली ही परंपरा पुढे कायम आहे.

> आमदार सत्यजित तांबे यांनी संगमनेर शहरासाठी २.० हे व्हिजन मांडले आहे. राजकारण विरहित सर्वांना सामावून घेणारी संगमनेर सेवा समिती असून आधुनिक योजनांसह संगमनेर शहर हायटेक बनवण्यासाठी आ. तांबे यांचा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहे.
>
> **– राजेश मालपाणी**

संगमनेर शहराच्या विकासात मालपाणी परिवाराची मोठी योगदान आहे या परिवाराने गुणवत्तेतून राज्यभरात आपला लौकिक निर्माण केला असून मालपाणी उद्योग समूहाच्या यशामध्ये कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. या सांघिक कामातून संगमनेरचा लौकिक वाढत असल्याचे आ. सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे. यावेळी गिरीश मालपाणी मनीष मालपाणी यांनीही मनोगत व्यक्त केली. तर डॉ. मैथिलीताई तांबे यांनी आगामी काळातील संगमनेर याबाबत मालपाणी उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. मनीष मालपाणी यांनी या कार्यक्रमाचे आभार केले. यावेळी मालपाणी उद्योग समूहातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कॅलिडोस्कोप




## ११ कोटींची लॉटरी आणि दवाखान्यात भरती!

लॉटरी लागावी आणि रातोरात आयुष्य बदलावं, असं अनेकांचं स्वप्न असतं. आयुष्यात कधीतरी लॉटरी लागेल या आशेनं अनेकजण तिकिटं विकत घेतात. परंतु त्यातून क्वचितच एखाद्याचं नशीब फळफळतं. असंच काहीसं ब्रिटनमधील नॉरफोक इथं राहणाऱ्या अॅडम लोपेझबाबत घडलं. एका लॉटरीच्या तिकिटामुळे तो चर्चेत आला आहे.

अॅडम एक सर्वसामान्य ड्राइव्हर असून त्याने लॉटरीचं तिकिट जिंकलं. याचं बक्षिस होतं तब्बल १.३ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच जवळपास ११ कोटी रुपये. त्यावेळी अॅडमच्या बँकखात्यात फक्त १७ डॉलर्स होते. परंतु एका लॉटरीमुळे आयुष्य पालटलं आणि तो क्षणार्धात करोडपती झाला. अचानक इतके पैसे मिळाल्यानंतर अॅडमला काय करावं हेच सुचत नव्हतं. आता मुक्तपणे जगायचं, कशाचीच पर्वा करायची नाही, असं त्यानं ठरवलं होतं. एका रात्रीत श्रीमंत झाल्यानंतर त्यानं ड्राइव्हरची नोकरी सोडली आणि त्यानंतर तो सलग तीन महिने पार्टी करत होता. 'मी न थांबता पार्टी करत होतो. आयुष्यात पहिल्यांदाच इतका मुक्त जगत होतो. परंतु पैशांच्या आहारी जाऊन मी चुकीच्या मार्गावर गेलो. इतके पैसे पाहून अगदी वेडापिसा झालो होतो. मी दिवसरात्र केवळ पार्टी करण्यात पैसे घालवत होतो', असं त्यानं सांगितलं. अशाप्रकारे जुलैमध्ये लॉटरी लागल्यानंतर त्याने तीन महिने सलग पार्ट्या केल्या. पण सप्टेंबरमध्ये त्याची तब्येत बिघडली. त्याला श्वास घेण्यास त्रास जाणवत होता आणि चालणंही कठीण झालं होतं.

अखेर रुग्णवाहिका बोलावून अॅडमला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. स्ट्रेचरवर उचलून रुग्णवाहिकेत ठेवण्यात आलं, तेव्हा आयुष्यातील सर्वांत मोठा धक्का बसल्याचं त्यानं सांगितलं. रुग्णालयात काही तपासण्या केल्यानंतर अॅडमच्या फुफ्फुसांमध्ये रक्ताच्या गुठळ्या असल्याचं निदान झालं होतं.

त्याच्यावर उपचार करण्यात आले. रुग्णालयात तो आठ दिवसांपेक्षा अधिक काळ होता. 'तिथले लोक देवदूतासारखे होते. त्यांनी मला जीवदान दिलं. माझ्यासाठी हा सर्वांत मोठा धडा होता. तुमच्याकडे दहा लाख असोत किंवा अब्जावधी रुपये असो... रुग्णवाहिकेत निपचित पडून असता तेव्हा कोणतेच पैसे महत्त्वाचे नसतात...' अशा शब्दांत तो व्यक्त झाला. अॅडम सध्या आरोग्यावर आणि पूर्णपणे बरं होण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. लवकरच पूर्णपणे बरं होण्याचं त्याचं ध्येय आहे. नोकरी सोडल्याचाही त्याला पश्चात्ताप झाला आहे.

## आता चालकविरहीत रिक्षा येणार

भारतात सध्या 'टेस्ला'ची चांगलीच चर्चा आहे. अशातच या कारला टक्कर देणारी ड्रायव्हरलेस ऑटो रिक्षा भारतात लाँच झाली आहे. 'ओमेगा सेकी मोबिलिटी' (ओएसएम) ने भारतीय बाजारपेठेत जगातील पहिली इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर लाँच केली असून 'स्वयंगती' असे या वाहनाचे नाव आहे. या रिक्षाचे बुकिंगही सुरू झाले आहे. प्रवासी प्रकाराच्या या रिक्षाची किंमत अंदाजे चार लाख आहे तर लॉजिस्टिक्स/कार्गो आवृत्ती लवकरच लाँच केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. याची किंमत अंदाजे चार लाख १५ हजार रुपये असेल. ही रिक्षा बॅटरीवर चालते आणि सिंगल चार्जमध्ये १२० किलोमीटरपर्यंतची रेंज देते. यात 'ओएसएम'चा इलेक्ट्रिक प्लॅटफॉर्म आणि 'एआय'आधारित ऑटोनॉमसी सिस्टम आहे.

'स्वयंगती'मध्ये रिडर, जीपीएस, एआय-आधारित अडथळा शोधणे (सहा मीटर पर्यंत), मल्टी-सेन्सर नेव्हिगेशन आणि रिमोट सेफ्टी कंट्रोल आदी समाविष्ट आहे. या प्रणाली विमानतळ, तंत्रज्ञानयुक्त उद्याने, स्मार्ट कॅम्पस, औद्योगिक केंद्रे आणि गर्दीच्या भागात स्वायत्तपणे कार्य करण्यास वाहनांना सक्षम करतात. 'स्वयंगती'



भारतातील रहदारी आणि विविध भूप्रदेशांची स्थिती लक्षात घेऊन डिझाइन केली आहे. ती उच्चघनता, कमी-वेगवान रहदारी तसेच स्मार्ट शहरे, औद्योगिक क्षेत्रे आणि वाहतूक केंद्रांसाठी आदर्श आहे. पूर्णपणे इलेक्ट्रिक असल्याने त्यात शून्य टेलपाइप उत्सर्जन आणि कमी ऑपरेटिंग खर्च अंतर्भूत आहे.

या ऑटोची तीन किलोमीटरच्या स्वायत्त मार्गावर पहिल्या टप्प्यातील चाचणी आधीच पूर्ण झाली असून त्यामध्ये सात थांबे, रिअल-टाइम अडथळा शोधणे आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय सुरक्षित प्रवासी हालचाल यांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात नियंत्रित वातावरणात व्यावसायिक रोलआउट सुरू होईल. 'स्वयंगती' हे केवळ उत्पादन लाँचिंग नाही तर भारतीय वाहतुकीच्या भविष्यातील हे एक मोठे पाऊल आहे. स्वायत्त वाहने आता भविष्याची कल्पनारम्य राहिलेली नाहीत तर वर्तमानाची गरज आहेत. आम्ही दाखवून दिले आहे, की भारत जागतिक ट्रेंडचे अनुसरण करण्याऐवजी त्यांचे नेतृत्व करू शकतो,' असे कंपनीचे संस्थापक आणि अध्यक्ष उदय नारंग यांचे म्हणणे आहे.

## रेल्वे स्टेशनवर औषधाचे दुकान का नसते?




रेल्वे फक्त प्रवासाचं एक साधन नसून खऱ्या अर्थानं भारतामध्ये अनेकांची ती जीवनवाहिनी आहे. देशाच्या बहुतांश भागांमध्ये रेल्वेच्या जाळ्याचा विस्तार झाला असून दळणवळणाचं हे साधन विकासामध्ये मोलाचा हातभार लावत आहे.

भारतीय रेल्वेनं प्रवास करणं म्हणजे एक खास अनुभव आहे. राज्य, प्रांत बदलत पुढे जाणारा हा प्रवास फक्त नव्या स्थानकांवरच पोहोचवत नाही तर वेगळ्या संस्कृतीपर्यंत पोहोचण्यास सुद्धा मदत करतो. रेल्वे एखाद्या स्थानकावर थांबली असता सहज बाहेर डोकावलं की दुकानं दिसतात. कुठं अल्पोपहार मिळतो, कुठं फक्त पाणी मिळतं तर कुठे वाफाळता चहा विकला जातो. रेल्वे स्थानकांवर फळं आणि भेळसुद्धा मिळते. मात्र तुम्ही एक गोष्ट कधी विचारात घेतली का? रेल्वे स्थानकावर औषधांचं दुकान अर्थात मेडिकल स्टोअर मात्र कधीच नसतं. असं का?

औषधांची विक्री हे सोपं काम नाही. त्यासाठी काही कायदेशीर नियम आणि अटीशर्थींचं पालन करणं अपेक्षित असतं. शिवाय औषधं ठराविक तापमानात, सुरक्षित स्थळी ठेवणं अपेक्षित असतं. औषधे विक्रेत्यांच्या दुकानावर एक परवानाधारक फार्मासिस्ट असणं गरजेचं असतं. रेल्वे स्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी या नियमांचं पालन सहसा होत नाही किंवा ते करणं आव्हानात्मक असतं. इथं बनावट औषधांची विक्री होण्याचा मोठा धोका असतो. शिवाय काही औषधांचा गैरवापर होणंही संभवतं. ज्यामुळे सहसा रेल्वे स्थानकांवर, फलाटांवर मेडिकल स्टोअर नसतात. आणखी एक कारण म्हणजे बाजारातील दरांपेक्षा रेल्वे स्थानकावर काही गोष्टींचे दर अधिक असतात. यामध्ये प्रवासभाडं आणि इतर गोष्टींची रक्कमही जोडली जाते. औषधांच्या बाबतीत कायदेशीररित्या तसं करणं गुन्ह्यास पात्र ठरतं. बहुतांश प्रवासी सवयीनुसार सोबत औषधांचा साठा बाळगतात. त्यामुळं बऱ्याचदा अशा मेडिकलना तोटा सोसावा लागतो. म्हणूनही रेल्वे स्थानकांवर मेडिकल नसतात.

अर्थात मेडिकल स्टोअर नसले तरीही रेल्वे स्थानकांवर फर्स्ट एड रुम मात्र असते. जिथं प्रशिक्षित वैद्यकिय कर्मचारी आणि डॉक्टर प्रवाशांच्या सेवेसाठी हजर असतात. आपात्कालिन परिस्थितीत इथं प्रवाशांना प्रथमोपचाराची सुविधा पुरवली जाते. परिस्थिती गंभीर असल्यास रुग्णाला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयातही पाठवण्याची व्यवस्था केली जाते.

## चॅटजीपीटीवरचा प्रश्न महागात, थेट तुरुंगात!

आता आपण कोणतीही छोटी-मोठी माहिती विचारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) अवलंबून राहतो. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर हवे असेल वा समस्येवर उपाय हवा असेल तर आपण प्रश्न विचारतो आणि 'एआय' काही सेकंदात उत्तर देतो. परंतु या तंत्राच्या उपयोगाचे विधायक आणि विघातक असे दोन भाग असतात. असाच काहीसा प्रकार एका शालेय मुलाबाबत घडला आहे.

आपण स्मार्ट दिसण्यासाठी इंटरनेटवर सर्च करतो. काही जण गुन्हेगारीबद्दलची माहिती 'एआय'ला विचारतात. त्यांना काही तरी चमत्कारिक उत्तर मिळेल अशी आशा असते; परंतु अशा प्रकारे प्रश्न विचारणे कधी-कधी महागात पडू शकते. नुकतीच अशी घटना उघडकीस आली आहे. अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यात राहणाऱ्या एका १३ वर्षांच्या मुलासोबत एक प्रसंग घडला. आता हा मुलगा चुकीची शिक्षा भोगत आहे. हा प्रकार डेलँड शहरातील 'साऊथ वेस्टर्न मिडल स्कूल' मधला आहे. येथील सातवीत शिकणाऱ्या या मुलाने वर्गात असतानाच चॅटजीपीटीवर एक प्रश्न टाईप केला आणि त्याला जन्माची अद्दल घडली.

या विद्यार्थ्याने चॅटजीपीटीवर 'मी माझ्या मित्राला कसे मारू शकतो? ' असा प्रश्न विचारला. स्वाभाविकच या प्रश्नामुळे शाळा प्रसाशन आणि पोलीस हादरले. या मुलाने असा प्रश्न विचारताच शाळेतील डिजिटल मॉनिटरिंग सिस्टम सक्रिय झाली. या सिस्टीमने ताबडतोब



शाळा प्रशासन आणि पोलिसांना अलर्ट पाठवला. काही वेळातच शाळेत पोलीस दाखल झाले आणि त्यांनी तपास सुरू केला. मात्र चौकशीत या मुलाचा कोणालाही नुकसान पोहोचवयाचा हेतू नसल्याचे समोर आले. मुलाने सांगितले की, आपल्याला त्रास देणाऱ्या एका मित्राची गंमत करण्यासाठी आपण सहज हा प्रश्न विचारला आकणि कोणते मजेशीर उत्तर येते, हे पाहण्याचा प्रयत्न केला. या उत्तरावरुन आपण मित्राला चिडवू असे त्याला वाटत होते. यासाठी हा उद्योग केल्याचे त्याने सांगितले.

मात्र पोलीस आणि शाळा प्रशासनाने यास गांभीर्याने घेतले. मुलगा मस्करी करत होता, तरी त्याचे असे वागणे संभाव्य धोक्याकडे इशारा करते. त्यामुळे यास हलक्यात घेता येत नाही, असे सांगण्यात आले. त्यामुळेच आता या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची रवानगी बालसुधारगृहात केली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

## घरकाम करणाऱ्या महिलेचा साठ लाखांचा फ्लॅट

कठोर परिश्रमाने मिळवलेल्या यशाच्या अनेक कथा तुम्ही ऐकल्या असतील. परंतु ही एक आश्चर्यचकित करायला लावणारी घटना आहे. घरकाम करणाऱ्या एका महिलेसंबंधीच्या या बातमीने 'सोशल मीडिया'वर सध्या खळबळ माजवली आहे. या बातमीने सर्वांना कर, बचत आणि आर्थिक नियोजन याबद्दल विचार करायला भाग पाडले आहे.

ही घटना गुजरातमधील सुरतमध्ये घडली. तिथे घरकाम करणाऱ्या एका महिलेने अलिकडेच ६० लाख रुपयांना आलिशान थ्री बीएचके फ्लॅट खरेदी केला. हा आश्चर्यकारक गौप्यस्फोट नलिनी उनगर नावाच्या एका माजी ट्विटर वापरकर्त्याने केला असून वर उल्लेख केलेली महिला त्यांच्याकडे मदतनीस म्हणून काम करणारी आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ६० लाख रुपयांच्या फ्लॅटसाठी फक्त १० लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. शिवाय तिने फर्निचरवर चार लाख रुपये खर्च केले आहेत. याचा अर्थ असा की, या महिलेने बचत आणि रोख रकमेतून आपले स्वप्न साकारले आहे.



नलिनीने पोस्टमध्ये लिहिले, आश्चर्य तिथेच संपत नाही. ही काही तिची पहिली मालमत्ता नव्हती. वेलांजा गावात तिचे आधीच एक दुमजली घर आणि एक दुकान होते. हे दोन्ही भाड्याने दिले होते. बाईंच्या या बोलण्याने नलिनी थक्क झाली आणि क्षणभर नि:शब्द झाली. तिची पोस्ट वाऱ्यासारखी पसरली असून प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने त्यावर कमेंट करत आहे. कमेंट सेक्शनमधील एक मोठा वर्ग याला 'कर न भरलेल्या पैशाची जादू' म्हणत आहे. एका वापरकर्त्याने म्हटले आहे की, पगारदार अर्धे उत्पन्न करांमध्ये गमावतात. घरकाम करणारे तसेच रस्त्यावरील विक्रेते कर भरत नाहीत, म्हणून ते इतरांपेक्षा लवकर संपत्ती जमा करतात. अनेक वापरकर्त्यांनी कररचना मध्यमवर्गाला खाऊन टाकत असल्याचे म्हणत नाराजी व्यक्त केली आहे. पण अनेकजण बाईंच्या मेहनतीचे कौतुक करत आहेत.

## हा आहे ००३




मेक्सिकोतल्या युक्तान प्रांतातल्या मेरिदा शहरात केसेरा पिझ्झा नामक पिझ्झा कंपनीने एका अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं होतं. या स्पर्धेत भन्नाट नावाच्या लोकांना मोफत पिझ्झा खायला मिळणार होता. या स्पर्धेत वेर्सिंगेटरोज, नीविया आणि बाहजिबादी या नावाचे लोक अंतिम फेरीत दाखल झाले. या तिघांपैकी एकाला विजेतेपद मिळेल, असं लोकांना वाटलं. तेव्हा तिथे एक मुलगा आला. त्याने आपलं नाव सेरो सेरो स्ट्रेस असल्याचं सांगितलं. स्पॅनिश भाषेत या शब्दाचा अर्थ '००३' असा होतो. या नावासमोर वेर्सिंगेटरोज, नीविया आणि बाहजिबादी ही नावं फिकी पडली आणि सेरोला विजेता ठरवण्यात आलं. मेक्सिकन लोक आपल्या मुलांची विचित्र नावं ठेवतात. पण सेरो सेरो स्ट्रेस हे नाव खूपच भन्नाट आहे. जेम्स बाँडच्या फॅनने आपल्या मुलाचं असं नाव ठेवलं असावं, असं अनेकांना वाटलं. तसंच हा मुलगा मस्करी करत असेल असंही अनेकांना वाटलं. या मुलाने मोठं झाल्यानंतर आपलं नाव बदललं असावं, असंही अनेकांना वाटून गेलं. पण प्रत्यक्षात तसं काहीच नव्हतं. पण आई-वडिलांनीच त्याचं नाव ठेवलं होतं. हा मुलगा आई-वडिलांचं तिसरं अपत्य होतं. त्यामुळे त्याचं नाव ००३ असं ठेवण्यात आलं. आपली जडणघडण अमेरिकेत झाल्याचं त्याने सांगितलं. लहानपणी त्याला बँबिनो म्हणायचे. या नावामुळे मला सेलिब्रिटी झाल्यासारखं वाटतं. अनोख्या नावामुळे बरेच लोक मला भेटतात, हस्तांदोलन करतात. आपल्याकडेही वेगवेगळी नावं असतात. पण ००३ हे नाव भन्नाटच म्हटलं पाहिजे.

## अस्वलं झाली हिंस्त्र



हवामानबदल आणि माणसांच्या घुसखोरीमुळे ध्रुवीय अस्वलांच्या वर्तनात बदल झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या कारणामुळे ध्रुवीय अस्वलं नरभक्षी होऊ लागली आहेत. ही अस्वलं अन्नाच्या शोधासाठी लांबवर भटकू लागली आहेत. मनुष्याच्या संपर्कात येणारी अस्वलं त्यांच्यावर हल्लाही करू लागली आहेत. इतकंच नाही, तर अन्नाच्या कमतरतेमुळे ती एकमेकांना मारू लागली आहेत. भूक भागवण्यासाठी अस्वलं कोणत्याही थराला जायला तयार आहेत. रशियन शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. पिलांसोबत असणाऱ्या मादी अस्वलांवर नर अस्वलं हल्ला करत आहेत. जीवाश्म इंधनाच्या शोधासाठी बऱ्याच कंपन्यांनी आपला मोर्चा पृथ्वीच्या ध्रुवांकडे वळवला आहे. यामुळे ध्रुवीय अस्वलांच्या अधिवासावर परिणाम होऊ लागला आहे. तापमानवाढीमुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवरचा बर्फ वितळू लागल्यामुळे या अस्वलांपुढे बरीच आव्हानं उभी ठाकली आहेत. आपलं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अस्वलं प्रयत्नशील आहेत. मोठ्या आकाराची अस्वलं लहानग्या पिलांना खाऊ लागली आहेत. ध्रुवीय अस्वलं बर्फाच्या खाली पाण्यात असणाऱ्या सील माशांची शिकार करून पोट भरतात. पण इथला बर्फ वितळू लागल्यामुळे सील माशांची संख्या रोडावली आहे. याच कारणामुळे अस्वलं सैरभैर झाली आहेत. हवामानबदलाचे अत्यंत घातक असे परिणाम आपल्याला सोसावे लागत आहेत. हे बदल थांबवले नाहीत, तर या पृथ्वीवरचं मानवाचं अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## इथे जायचंय... अॅपेंडिक्स काढून घ्या!

प्रत्येक देशात राहण्याचे काही नियम आणि अटी असतात. भारतीय नागरिकांकडे आधार क्रमांक असणं गरजेचं असतं. देशाचं नागरिकत्व बहाल करतानाही काही गोष्टींचा विचार केला जातो. एखाद्या देशात जाण्यासाठी आपल्याकडे व्हिसा असणं गरजेचं असतं. मात्र या परवानग्या, अटी हे सगळं कागदपत्रांपुरतं मर्यादित असतं. पण एखाद्या ठिकाणी राहण्यासाठी तुम्हाला अॅपेंडिक्सची शस्त्रक्रिया करायला सांगितली तर... आश्चर्य वाटलं ना! हे ठिकाण अंटार्क्टिकामध्ये आहे. या भागातल्या एका वस्तीत अधिक काळपर्यंत राहण्यासाठी अॅपेंडिक्स काढून टाकणं गरजेचं आहे. विलास लास अॅस्ट्रेलास असं या भागाचं नाव आहे. या भागात शास्त्रज्ञ आणि चिली देशाचं हवाई दल तसंच लष्कराचे अधिकारी राहतात. या भागात फक्त १०० लोक राहतात. काही लोक इथे आपल्या कुटुंब कबिल्यासह राहतात. इथे थोड्या-फार सोयी-सुविधा आहेत. अंटार्क्टिकामध्ये मोठं रुग्णालय असलं तरी ते विलास लासपासून एक हजार किलोमीटर अंतरावर आहे. इथे मोजके डॉक्टर्स आहेत. पण शल्यविशारद नाही. त्यामुळे कोणालाही अचानक अॅपेंडिक्सचा त्रास झाल्यास उपचार मिळू शकत नाहीत. याच कारणामुळे इथे अॅपेंडिक्स शस्त्रक्रिया करून घेणं गरजेचं ठरतं. या भागातलं सरासरी तापमान उणे २.३ अंश सेल्सियस आहे.



अंक्टार्क्टिकाच्या इतर भागाच्या तुलनेत हा भाग उष्ण मानला जातो. या भागात राहणं खूपच आव्हानात्मक आहे.

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर, बुधवार, दि. ०३ डिसेंबर २०२५ पान नं.८

## बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड :** जामखेड तालुक्यातील बावी शिवारात बिबट्याने महिलेवर हल्ला केल्याची घटना काल सायंकाळी ६ वाजता घडली. या घटनेत खांडवी व बावी या दोन्ही गावच्या शिवावर राहत असलेल्या उषाबाई सौदागर चव्हाण (वय ४५) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर जामखेड येथे ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिकारी डॉ. शशांक शिंदे यांनी प्राथमिक उपचार करून अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी पाठवले आहे. फक्राबाद व बावी येथे शिवावर राहत असलेले सावता राऊत यांचे ३ बोकड बिबट्याने ठार केले आहे. या घटनेने या जामखेड तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. सदर बिबट्याचा वन विभागाने त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# श्रीरामपुरात सरासरी ७३ टक्के मतदान








**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** किरकोळ वादविवाद सोडता मतदान शांततेत श्रीरामपूर –श्रीरामपूर नगरपरिषदेत सरासरी ७३ टक्के मतदान झाले. ३४ नगरसेवकांसह नगराध्याक्षांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी होणार आहे.

काल सकाळी साडेसात वाजता मतमोजणीस सुरूवात झाली. सकाळी मतदानाचा जोर कमी होता. थंडीमुळे मतदार बाहेर पडले नाहीत. त्यामुळे सकाळी ११ वाजेपर्यंत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांचा अत्यल्प प्रतिसाद होता. साडेअकरापर्यंत शहरात फक्त पंधरा टक्के मतदान झाले होते. त्यानंतर मतदानाचा टक्का वाढायला सुरुवात झाली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुमारे ५५ टक्के मतदान झाले होते. परंतु शहरातील अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. रात्री उशिरापर्यंत तेथे मतदान सुरू होते. प्रशासनाकडून ही बाब गृहीत धरून प्रत्येक ठिकाणी विजेची आणि इतर सोय करण्यात आली होती.

मतदान केंद्रांवर मतदार यादी मध्ये अनुक्रमांकाचा गोंधळ झाल्याने सर्वच मतदारांना मनस्ताप झाला. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये प्रभागातील यादीनुसार अनुक्रम नंबर न घेता एक नंबर पासून सुरुवात केल्याने आपला नंबर कोणत्या यादीत आहे हे मतदारांना माहित होत नव्हते. त्यामुळे त्यांना प्रभागातील सर्वच मतदान केंद्रामध्ये जावे लागले. मतदान अधिकारी व कर्मचारी यांना देखील मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

नवीन मराठी शाळेमध्ये प्रभाग बारा च्या मतदान केंद्रांवर दोन महिला उमेदवारां च्या समर्थकांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याने दोन्हीकडचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते. त्यावेळी तातडीने पोलीस घटनास्थळी आल्याने पळापळ झाली. याचा फटका मतदारांनाही बसला. या गोंधळामुळे काहींनी मतदान करता घरी जाणे पसंत केले.

डीडी काचोळे विद्यालय येथे प्रभाग क्रमांक १४ आणि १६ चे मतदान बुथ होते.त्यामुळे येथे दुपारी साडेतीन वाजता प्रचंड गर्दी झाली होती. मतदान करून लोक मैदानातच थांबत असल्याने शेवटी पोलिसांना ध्वनीक्षेपकावरून सूचना देऊन मतदार मैदानाबाहेर काढावे लागले.

# प्रकाशगिरी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमामध्ये हरिद्वार येथील ब्रह्मलीन महंत स्वामी श्री प्रकाशगिरीजी महाराज यांचा चौथा पुण्यतिथी सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत सुनीलगिरीजी महाराज यांचे गुरुवर्य असलेल्या ब्रह्मलीन महंत श्री प्रकाशगिरीजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संतमहंतांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

हा सोहळा हरिद्वार येथील महंत श्री ओंकारजी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने, गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व महंत सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गीता जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता. यावेळी महंत सुनीलगिरीजी महाराज, साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य व वारकरी भूषण चंद्रभान महाराज म्हसलेकर यांच्या हस्ते स्वामी प्रकाशगिरीजी महाराज यांच्या पादुका व प्रतिमेचे विधीपूर्वक पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

प्रकाशगिरीजी महाराज यांनी पंचायती निरंजन आखाड्याच्या माध्यमातून धर्मकार्याला दिशा देणारे अनेक शिष्य घडवले.

# कडाक्याच्या थंडीत गरजूंना ब्लँकेट वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तापमानाचा पारा घसरला असून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. अशा कडाक्याच्या थंडीत पांघरून न घेता बाहेर रस्त्यावर झोपलेल्या गरजू व्यक्तींना स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने शहरात सुमारे ५० जणांना ब्लँकेट वाटप केले.

शहरात मागील काही दिवसांपासून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. शहराचा पारा १० अंश सेल्सीअसपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे रात्री सात वाजल्यानंतर दुकाने बंद होऊ लागली आहेत. मात्र, या परिस्थितीत निराधार, अनाथ, गरीब लोक रस्त्याच्या कडेला, दुकानाबाहेर कुडकुडत झोपत आहेत. तर काही व्यक्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक एवढेच नव्हे, तर सार्वजनिक चौकात जागा मिळेल त्या ठिकाणी रात्रीची झोप घेऊ लागले आहेत.



दरम्यान, यांची कडाक्याच्या थंडीत होणारी स्थिती लक्षात घेऊन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी रात्रीच्या वेळी शहरातील सावेडी, पाईपलाईन रोड, दिल्लीगेट, मार्केट यार्ड, माळीवाडा, सार्वजनिक ठिकाणी तसेच बसस्थानक, रेल्वेस्थानक येथे जाऊन कडाक्याच्या थंडीत झोपलेल्या गरजूंच्या अंगावर ऊबदार चादर पांघरून त्यांना मायेची ऊब दिली.

# संजीवनीचे ब्रास बॅन्ड पथक राज्यात प्रथम

## विभागीय स्पर्धेत संजीवनी करणार महाराष्ट्राचे नेतृत्व

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** भारत सरकार शैक्षणिक मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, नवी दिल्ली आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजीत राज्यस्तरीय भव्य ब्रास बॅन्ड स्पर्धा २०२५-२६ मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ब्रास बॅन्ड पथकाने अप्रतिम, शिस्तबध्द आणि कलात्मक सादरीकरण




करून महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेत राज्यभरातुन एकुण ३७ संघांनी सहभाग नोंदविला. यातील बहुतांशी संघ मोठ्या महानगरी क्षेत्रातील होती. यातील सात संघ अंतिम फेरीत पोहचली. यात ग्रामीण भागातील संजीवनीचा सहभाग होता. इ. १० वी मधिल कॅडेट विपुल दिपक वाघ याच्या नेतृत्वाखाली ३७ कलांकारांनी ब्रास बॅन्ड कलेचे शिस्तबध्द व शास्त्रशुद्ध सादरीकरण करून परीक्षकांच्या विविध कसोट्या पुर्ण करून राज्य विजेतपदाची मोहर उमटवली.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे व विश्वस्त सुमित कोल्हे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे तसेच नॉन अकॅडमिक डायरेक्टर श्री डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर, संगीत शिक्षक श्री महेश गुरव, कॅम्पस अॅडमिन विजय भास्कर, यांनी विभागीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

अतिशय प्रामाणिक मेहनत, नियमित सराव, शास्त्रोक्त मार्गदर्शन आणि जिंकण्याची जिध्द या बाबींनी संजीवनीच्या ब्रास बॅन्ड पथकाने राज्यात विजयाची मोहर उमटवली. ब्रास बॅन्ड हा सांस्कृतिक क्रीडा प्रकार आहे. यात शारीरिक क्षमतेबरोबरच कलेचे कसब लागते. इतर क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय यशस्वी विद्यार्थ्यांना शासन अधिकचे गुण देवुन त्यांना शासकीय सेवेतही आरक्षण देते. तशाच सवलती ब्रास बॅन्डच्या यशस्वी विद्यार्थ्यांना मिळणे गरजेचे आहे.

**सुमित कोल्हे,**
**विश्वस्त.**

# शेवगाव नगरपरिषद निवडणूक उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव नगरपरिषद निवडणुकीत मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. शहरातील १२ प्रभागांसाठी ४१ मतदान केंद्रांवर शांततेत आणि सुरळीत मतदान पार पडले. एकूण ३५,४७९ मतदारांपैकी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत २४४४३ मतदान झाले असून म्हणजेच ६९ टक्के मतदान झाले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी सहा उमेदवार तर नगरसेवक पदासाठी तब्बल १०० उमेदवारांच्या



भवितव्याचा निर्णय मतपेट्यांमध्ये बंद झाला आहे. सकाळपासूनच नागरिकांनी मतदानासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. काही मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः महिला आणि नवमतदारांचा उत्साह उल्लेखनीय राहिला. प्रत्येक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांकडून मतदारांना बूथवर आणण्यासाठी धावपळ, संपर्क मोहिमा, वाहन व्यवस्था आणि समन्वयाचे प्रयत्न दिवसभर पाहायला मिळाले. काही ठिकाणी किरकोळ वाद-विवादाच्या घटना घडल्या असल्या तरी देखील निवडणूक प्रक्रिया अखंडित आणि सुरळीत राहिली.

निवडणूक सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शेवगाव शहराला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी मतदान केंद्रांची पाहणी केली आणि स्थानिक पोलिसांना आवश्यक सूचना दिल्या. तसेच पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व बूथवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सुरक्षा कर्मचारी, गस्त पथके आणि नियंत्रण कक्ष अखंड सक्रिय होते.

दरम्यान, न्यायालयीन प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मतमोजणी आणि निकाल जाहीर करण्यात १५ ते २० दिवसांचा विलंब होणार असल्याने उमेदवार व समर्थकांमध्ये हिरमोड दिसत आहे. निकालापूर्वीच्या प्रतीक्षेच्या कालावधीत शहरात राजकीय चर्चा, समीकरणे, अंदाज आणि विश्लेषणांना उधाण येण्याची शक्यता आहे.

मतदानाच्या दिवसभरात निवडणूक कर्मचारी, सुरक्षा दल, प्रशासन आणि स्थानिक पोलिसांचा समन्वय उत्कृष्ट राहिल्याचे निरीक्षक मांडत आहेत.

# निवडणूक पुढे ढकलताच उमेदवारांमध्ये शांतता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव नगरपरिषदेची निवडणूक पुढे ढकलताच उमेदवारांमध्ये शांतता निर्माण झालेली आहे.

कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना अनेक इच्छुक उमेदवार अंगाला माती लावून मैदानात उतरले होते. त्यामुळे शहरांमध्ये विविध प्रभागांमध्ये कॉर्नर सभा तसेच मोठमोठ्या नेत्यांच्या जाहीर सभा आणि वैयक्तिक गाठी भेटीवर जोर देणे सुरू असतानाच अचानक निवडणूक आयोगाने न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे कोपरगाव नगरपरिषदेची निवडणूकीचा कार्यक्रम २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला निकाल लागेल, असे जाहीर केले होते. मात्र त्यानंतर न्यायप्रविष्ठ प्रकरणांमुळे सदरचा सुधारित निवडणूक कार्यक्रम जिल्हाधिकारी ४ डिसेंबर रोजी जाहीर करतील व सुधारित नियमानुसार २० डिसेंबरला मतदानाची प्रक्रिया पार पडेल व २१ डिसेंबरला मतमोजणीचा आदेश काढण्यात आला.

यावर नागपूर खंडपीठात काल झालेल्या सुनावणीवेळी सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतमोजणीचा निकाल २१ डिसेंबरला लावता येईल का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केली. याबाबतचा सगळा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# राहुरीत सरासरी ७० टक्के मतदान




**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी नगरपरिषद निवडणूक २०२५ या निवडणुकीचे मतदान किरकोळ वादावादी सोडली तर शांततामय पार पडले. सरासरी ७० टक्के मतदान झाल्याचे अंदाज आहे.

यावेळी राहुरी शहरातील विद्यामंदिर प्रशाला, प्रगती विद्यालय, भागीरथीबाई कन्या प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय, शहरातील अहिल्या भवन, तनपुरेवाडी येथील शाहू मंगल कार्यालय, राहुरी कॉलेज राहुरी, नगर परिषदेच्या शाळांमध्ये तसेच अशा एकूण ३८ केंद्रांमध्ये पार पडले. निवडणूक आयोगाने आज निवडणूक निकालाची तारीख बदलून ती २१ डिसेंबर केल्यामुळे उमेदवारांचा आणि नागरिकांचा हिरमोड झाल्याचे पाहायला मिळाले.

राहुरी शहरातील राहुरी कॉलेज या ठिकाणी मतदान पेटी (बॅलेट मशीन) ठेवण्यासाठी स्ट्राँग रूमची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्यामुळे २० दिवस या ठिकाणी चोख बंदोबस्त असणार आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव आणि राहुरी तालुक्याचे तहसीलदार नामदेव पाटील यांनी दिली.

# रेणुका नगरमध्ये स्वच्छता मोहीम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहराची स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणाची शाश्वत जपणूक ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचीही सामूहिक जबाबदारी आहे. याच भावनेतून गुलमोहर रोड येथील रेणुका नगरातील मनपाच्या ओपन स्पेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेली अस्वच्छता, कचरा व दुर्गंधीची समस्या तातडीने सोडवण्यासाठी माजी नगरसेवक रामदास आंधळे यांच्या पुढाकारातून मोठी



स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या ओपन स्पेसमध्ये कचरा साचून राहिल्याने परिसरात डास, कीटक, दुर्गंधी आणि अस्वस्थ वातावरण निर्माण झाले होते.

स्वच्छता मोहिमेनंतर बोलताना माजी नगरसेवक रामदास आंधळे म्हणाले, आपला प्रभाग स्वच्छसुंदर ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मनपाच्या मालकीच्या ओपन स्पेसची देखभाल नागरिकांच्या सहकार्यातून उत्तम प्रकारे केली जाऊ शकते. स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षण ही आता काळाची गरज आहे. नागरिकांनी पुढे येऊन अशा मोहिमांना हातभार लावला तर प्रभाग ३ हा संपूर्ण शहरासाठी आदर्श प्रभाग बनू शकतो. तसेच या ओपन स्पेसला भविष्यात हरित क्षेत्रामध्ये रूपांतरित करण्याचे नियोजन असून त्यासाठी स्थानिक नागरिकांची मोठी साथ मिळत आहे. असे ते म्हणाले. स्वच्छता मोहिमेत माजी नगरसेवक नितीन शेलार, शिरीष जानवे, अशोक गिरी, पांडुरंग मगर, डॉ. कैलास गावडे, विजया गांगर्डे, डॉ. सर्जेराव काळे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

# फुले विद्यापीठाच्या कुलगुरूपदी खर्चे

## डॉ. विलास खर्चेंच्या कामांचे विशेष कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या कुलगुरूपदी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील माजी संशोधन संचालक डॉ. विलास काशिनाथ खर्चे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा कुलपती आचार्य देवव्रत यांनी विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. कृषी शिक्षण व संशोधन क्षेत्रातील ही महत्त्वपूर्ण नियुक्ती मानली जात असून सर्वत्र तिचे स्वागत होत आहे.



### विकासाला प्राधान्य: खर्चे

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना डॉ. विलास खर्चे यांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची ग्वाही दिली. विद्यार्थ्यांचे कौशल्यविकास, जागतिक दर्जाच्या संशोधनाला चालना आणि शेतकरी-केंद्रित उपक्रमांना नव्या उंचीवर नेण्याची प्रतिज्ञा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. खर्चे हे राज्यातील कृषी संशोधन क्षेत्रातील ज्येष्ठ, अनुभवी आणि दूरदृष्टी असलेले अधिकारी म्हणून परिचित आहेत. त्यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात संशोधन संचालक (आर. एल. टी.) पदावर काम करताना शेतीसंबंधित अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प राबवले. हवामान बदलास अनुरूप शेती, अन्नधान्य आणि कडधान्य पीक सुधारणा, गुणवंत बियाणे उत्पादन, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकरी सक्षमीकरण या क्षेत्रांत त्यांच्या कामाचे विशेष कौतुक झाले आहे.

# दाढ येथील सप्ताहाची उत्साहात सांगता

## सप्ताहाच्या निमित्ताने नेते एकाच व्यासपीठावर!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** ब्रम्हालिन माणिकगिरी महाराज व बिरोबा महाराज फिरता नारळी १९ वा अखंड हरिनाम सप्ताह दाढ खुर्द येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. सप्ताहाच्या सांगता प्रसंगी राजकीय मतभेद विसरून माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि विखे पाटील गटाच्या नेत्यांची एकाच व्यासपीठावर झालेली उपस्थिती उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनासाठी आणि समारोपासाठी




माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, अॅड. पोपटराव वाणी, राजहंस दूध संघाचे व्हाइस चेअरमन राजेंद्र चकोर, विक्रमराजे थोरात, सुरेशराव नागरे, भारतराव गीते, शिबलापूरचे सरपंच प्रमोद बोंद्रे यांच्यासह दाढ खुर्द व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या सप्ताहात दाढ खुर्द आणि आजूबाजूच्या अनेक गावांमधून भाकरी आणि आमटीचे अन्नदान करण्यात आले. दररोज हजारो भाविकांनी भाकरी, आमटी आणि लापशी या प्रसादाचा आस्वाद घेतला. सप्ताहाच्या पूर्ण कालावधीत सुमारे एक लाखापेक्षा जास्त भाविकांनी दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतल्याची माहिती आयोजकांनी दिली.

केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक भान जपत या सप्ताहात रक्तदान शिबीर, कृषी प्रदर्शन आणि विविध प्रदर्शने भरविण्यात आली होती. विशेष कौतुकाची बाब म्हणजे, दाढ खुर्द गावातील नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेल्या ३५ युवकांनी एकत्र येत सप्ताहासाठी ६१ हजार रुपयांची देणगी दिली. तसेच नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून ६१ हजार रुपये, तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून ५१ हजार रुपयांची मदत देण्यात आली.

### संन्याशाची सेवा करा: दत्तगिरी महाराज

काल्याचे कीर्तन करताना ह.भ.प. दत्तगिरी महाराज यांनी उपस्थितांना मोलाचा उपदेश केला. ते म्हणाले, ''हा सप्ताह विखे आणि थोरात यांच्या सीमेवर असून दोन्ही नेते परमार्थाला मानणारे आणि मदत करणारे आहेत. संन्याशाच्या पायावर डोके ठेवावे, पण पाय लावू नये. सेवा केली तर कृपा आहे, मात्र पाय लावल्यास ती आग आहे, ती भस्म केल्याशिवाय राहत नाही.'' यावेळी त्यांनी गुरुवर्य नारागिरी महाराजांच्या आशीर्वादाचा उल्लेख केला.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11